श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



फेब्रुवारी १९८८

श्री
# साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

श्री साई काव्य बहार विशेषांक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चेंदवणकर**

(मराठी आवृत्ती)

ा ६६ वे) **किंमत २ रुपये** (अंक ११ वा

**दूरध्वनीः- ४१२ २५ ६१**

- कार्यालय -

निकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

४०

निकट संबंध तुझा वासूदेवा।
जागृती या जीवा दिली तूंची ॥
इच्छामात्रें तुझ्या वाटे तें करिशी ।
नाम हृषीकेशी सुशोभलें॥
देई भक्तिसुख देई दिव्यज्ञान ।
तुझ्या या अज्ञान बालकासी ॥
कर जोडुनियां क्षमा मागतसे ।
पायीं लागतसे दास तुझ्या ॥

४१

पावन करि गुरुनाम । सदोदित ॥धृ.॥
संकटिं पडतां या संसारी ।
नाम देई आराम ॥ सादेदित ॥
कलत्र बंधू मित्र सोयरे।
कोणि न येती काम ॥ सदोदित ॥
विश्वासातें दृढ धरि हृदयीं ।
क्लेश हरी गुरुनाम ॥ सदोदित ॥
अनन्यभावें शरण गुरुला ।
प्रेमें करित प्रणाम ॥ सदोदित ॥

४२

क्षणक्षण जाई न ये परतूनी ।
पक्कें समजूनी घेई मनीं ॥
गुरुनाम गोड भावें घेता कळे ।
स्वादरस मिळे अंतरांत ॥
जीवशिव तेथें डोलती आनंदें ।
मन चोर बंदें अटकेंत ॥
दास म्हणे माझे गुरु बाबासांई
प्रेमें गुण गाई तोचि धन्य ॥

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साईलीला, फेब्रुवारी १९८८
# श्री साई काव्यबहार विशेषांक

## अनुक्रमणिका

### श्री साई काव्यबहार विशेषांकाचे मानकरी


| क्रमांक | कवी/कवयित्रीचे नाव | पृष्ठ क्रमांक | क्रमांक | कवी/कवयित्रीचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | संपादकीय | ५ | २५ | सौ. प्रतिभा पाडगावकर | १८ |
| २ | श्री. चकोर आजगांवकर | ७ | २६ | श्री. राजन शिंदे | १९ |
| ३ | सौ. उमाबाई अमलाडी | ७ | २७ | कु. सिंधु थोरात | १९ |
| ४ | श्री. ज. पु. जोशी | ८ | २८ | श्री. रमेश चव्हाण | २० |
| ५ | सौ. अपर्णा मोहिले | ८ | २९ | श्रीमती अन्नपुर्णा कुळकर्णी | २० |
| ६ | प्रा. श्री. र. श्री. पुजारी | ९ | ३० | श्री. इन्दुकुमार नाईक | २१ |
| ७ | सौ. वासंती नांदेडकर | ९ | ३१ | सौ. सुमदा करंगुटकर | २१ |
| ८ | सौ. प्रमोदिनी पोतनीस | १० | ३२ | श्रीमती श्री. शहाणे | २२ |
| ९ | श्री. पद्माकर महाराज | १० | ३३ | डॉ. कु. इंदू नाईक | २२ |
| १० | सौ. निर्मला मालवणकर | ११ | ३४ | सौ. सुनिता सकपाळ | २२ |
| ११ | सौ. निलिमा नाईक | ११ | ३५ | सौ. नीलम देशपांडे | २३ |
| १२ | श्री अनंत दाभोळकर | १२ | ३६ | श्री. प्रभाकर कुबल | २३ |
| १३ | श्री. हसमुख पाटील | १२ | ३७ | सौ. कुमुदिनी टिळक | २४ |
| १४ | सौ. लीला मराठे | १३ | ३८ | श्री. बाळ चित्रुक | २५ |
| १५ | सौ. सिंधु सणस | १३ | ३९ | प्रा. श्री. एच. बी. महाले | २६ |
| १६ | डॉ. श्री. अनिल मोरे | १४ | ४० | श्री. रा. ब. बारअी | २६ |
| १७ | प्रा. श्री. प्र. के. धर्माधिकारी | १४ | ४१ | सौ. नीता जाधव | २७ |
| १८ | श्री. राम धनावडे | १५ | ४२ | श्री. म. न. घाटुर्ले | २८ |
| १९ | श्री. अशोककुमार रणदिवे | १५ | ४३ | सौ. मधु गायकवाड | २८ |
| २० | सौ. शोभा देशपांडे | १६ | ४४ | श्री. अरविंद गोखले | २९ |
| २१ | सौ. शशिकला सोनावणे | १६ | ४५ | सौ. शकुंतला जगतकर | ३० |
| २२ | श्री. नागेश मोगलाईकर | १७ | ४६ | श्री. मधुसूदन सावंत | ३० |
| २३ | श्री. हरीभाऊ बोबडे | १७ | ४७ | कु. रोहिणी जाधव | ३१ |
| २४ | श्री. विश्वनाथ चव्हाण | १८ | ४८ | सौ. नलिनी चिटणीस | ३१ |

| क्रमांक | कवी/कवयित्रीचे नाव | पृष्ठ क्रमांक | क्रमांक | कवी/कवयित्रीचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ४९ | डॉ. सुमन खानविलकर | ३२ | ७७ | सौ. अलका जवळकर | ४७ |
| ५० | श्री. शशिकात शिंदे | ३२ | ७८ | श्री. मधुकर कोथमिरे | ४७ |
| ५१ | श्री. बाबू डिसोजा | ३३ | ७९ | श्री. दत्तात्रय जोशी | ४८ |
| ५२ | कु. अलका भुजबळराव | ३३ | ८० | श्री. मधु पाटणकर | ४९ |
| ५३ | श्री. रा. ब. खाडीलकर वकील | ३४ | ८१ | श्री. अंकुश सुर्वे | ४९ |
| ५४ | श्री. मोहन सोनवणे | ३४ | ८२ | श्रीमती शशिकला रेवणकर | ५० |
| ५५ | डॉ. श्री. विनायक दुर्गे | ३५ | ८३ | श्री. म. द. अधिकारी | ५० |
| ५६ | श्री. सुरेश गोसावी | ३६ | ८४ | सौ. सरल काबाडी | ५१ |
| ५७ | सौ. सरोजिनी मुळ्ये | ३७ | ८५ | श्री. कृ. व्यं. हवालदार | ५२ |
| ५८ | श्री. दादासाहेब कोते | ३७ | ८६ | सौ. कल्पना कोरडे | ५२ |
| ५९ | डॉ. श्री. ग. स. कामत | ३८ | ८७ | सौ. शरयू मंत्री | ५३ |
| ६० | श्री. द. भट | ३८ | ८८ | श्री. विजय सहामते | ५४ |
| ६१ | श्री. राजेंद्र गवळी | ३९ | ८९ | श्री. विलास पडवळ | ५४ |
| ६२ | श्री. वि. म. हटवार | ३९ | ९० | सौ. वैशाली गोरे | ५५ |
| ६३ | श्री. श्री. तु. नाईक | ४० | ९१ | श्री. आनंद सातार्डेकर | ५६ |
| ६४ | डॉ. कु. सुनंदा कुलकर्णी | ४० | ९२ | श्री. मधुभाई चेंदवणकर | ५६ |
| ६५ | सौ. निना साळवी | ४१ | ९३ | कु. उज्वला घावरे | ५७ |
| ६६ | श्री. गजानन कुळकर्णी | ४१ | ९४ | श्री. बबन येरम | ५८ |
| ६७ | सौ. पुष्पा बागुल | ४२ | ९५ | श्री. श्याम नर्से | ५८ |
| ६८ | श्री. विजय हजारे | ४२ | ९६ | सौ. नलीनी देशपांडे | ५९ |
| ६९ | श्री. चिंतामण शिंत्रे | ४३ | ९७ | श्री. गणेश नाईक | ६० |
| ७० | श्री. गो. द. पाठक | ४३ | ९८ | सौ. रंजना पवार | ६१ |
| ७१ | सौ. संगीता गोडबोले | ४४ | ९९ | श्री. डी. डी. चव्हाण | ६१ |
| ७२ | श्री. भालचंद्र वाकनीस | ४४ | १०० | डॉ. श्री. वि. ने. शिराढोणकर | ६२ |
| ७३ | श्रीमती रुक्मिणी बेंद्रे | ४५ | १०१ | डॉ. सौ. मालती राहाटे | ६२ |
| ७४ | श्री. विनोद शिरसाट | ४५ | १०२ | श्री. एम. एन. खटावकर | ६३ |
| ७५ | श्री. अशोककुमार सातव | ४६ | १०३ | शिरडी वृत्त | ६४ |
| ७६ | श्री. अशोक साप्ते | ४६ | | | |

## संपादकीय

# हा घ्या काव्य बहार गुच्छ



प्रिय साईभक्त बंधु-भगिनींनो,

दरमहा तुम्ही तुमच्या आवडत्या 'श्री साईलीला' मासिकाची अगदी उत्कटतेने वाट पाहात असता नाही का? अंक एकदा का हाती पडला की, तो हातचा न सोडता एकाच बैठकीत अथपासून इतिपर्यंत चाळणे नुसते तर राहोच पण वाचून काढण्याचा अनेक वाचकांचा अगदी परिपाठ आहे. विशेषतः वाचक भक्त मंडळी नोव्हें-डिसेंबरच्या दिवाळी जोड अंकाची व फेब्रुवारीच्या काव्य बहार विशेषांकाची आतुरतेने वाट पाहात असतात. आम्ही ते वेळीच त्यांच्या हाती पडावेत यासाठी शिकस्त करतो खरं पण अंकाची मागणी एवढी भरमसाठ आहे की छपाईला सुद्धा तेवढा वेळ द्यावा लागतोच.

श्री साईलीला हे मासिक श्री साईबाबांचे स्वतःचे असे खास मासिक आहे. ते त्यांनी आपल्या लाडक्या भक्तांसाठी, त्यांच्या लेखनासाठीच ६५-६६ वर्षांपूर्वी सुरू करून ठेवले आहे. त्यामधून त्यांच्या भक्तांचे लेख, अनुभवलेख, कविता, पदे, आरत्या इ. विविध व त्यांच्या संबंधीचेच असे साहित्य आतापर्यंत प्रसिद्ध होत आलेले आहे, व यापुढेही येतच राहाणार आहे. खास करून वरील दोन्ही अंकांतून तर भक्तांचच सारे सारे साहित्य अगदी खच्चून भरलेले असते, त्याचे स्वागत करण्यासाठीच वाचक अंगदी आतुर असतात हं!

दिवाळी अंक निघाल्यानंतर हा साईकाव्यांचा अंक नित्याप्रमाणे ऐन गुलाबी थंडीत तुमच्या हाती ठेवण्यात आम्हास आनंद होत आहे. १९७५ सालापासून श्री साईलीला लेखक-कवी संमेलन शिरडीत भरण्यास सुरुवात झाली. १९८६ सालापर्यंत एकंदर १२ संमेलने यशस्वीरित्या पार पडली. अशा संमेलन प्रसंगीच कवितांचा हा गुच्छ अंक काढण्यास सुरुवात झाली. फेब्रुवारी १९७७ सालापासून म्हणजे तिसऱ्या संमेलना पासून काव्य बहार अंक प्रकाशित करण्यास सुरुवात झाली. पहिला अंक तेव्हाचा. तेव्हापासून असे अंक संमेलन प्रसंगीच अध्यक्षांचे हस्ते प्रकाशित होऊन ते वाचकांच्या हाती पडू लागले. पण आता अलिकडे गेल्या दोन वर्षापासून ते अगदी थेट तुमच्या हाती पडत आहेत. यंदाचा हा १२वा साईकाव्यबहार विशेषांक आहे. भक्तांच्या ९० वर निवडक कविता या अंकात छापल्या आहेत. यापूर्वीच कवितांचा प्रचंड ढीग आमच्या टेबलावर होता. असूंद्यात. बाबांच्या विषयींच्या त्या आहेत ना! मग त्यातून निवडता निवडता चांगले आठ-दहा दिवस लागले. लागू देत. श्रींच्या कविता आहेत ना त्या! भक्तांच्या व्यक्त भावना आहेत त्या. त्यावरुन संपादकीय संस्कारांचे हात

फिरविण्यात आणखीन चार सहा दिवस गेले. जाऊ देत. महाराजांच्यावर भक्तां वाहिलेली ती काव्य सुमने आहेत. ती व्यवस्थित वाहिली गेली पाहिजेत म्हणून हा सा खटाटोप करुन ही भक्ती कुसुमे तुमचे समोर ठेवलेली आहेत. ती स्वीकारावीत

भक्तांनो, १२ वर्षे हा काव्य बहार विशेषांक प्रकाशित होत आहे. केवढा का दरम्यान गेला आहे. प्लॅस्टिक युगात सध्या आपण वावरत आहोत. दूरध्वनी दूरदर्शनने आपण अक्षरशः चक्रावून गेलो आहोत श्री बाबाही आहेत तिथेच आहेत पण भक्तांनो, तुमच्या लेखनात मात्र काही एक बदल झालेला नाही. बाबांच्या मासिकाकरिता कसे तरी वेडेवाकडे, शुद्ध-अशुद्ध लिहून मजकूर पाठवित असत लेखांप्रमाणेच दोन-दोन, तीन-तीन पाने कविताही करुन पाठविता. तुमच्या लेखना योग्य ते बदल करुन, काटछाट करुन, फेरफार करुन, सुधारणा करुन व त्या पलिकडे जाऊन तुमचे लेखन पुन्हा स्वच्छ लिहून काढून ते छपाईस देण्यापर्यंत आम्ही सहाय्य करीत आजवर आलो आहोत. पण असे हे कुठवर चालणार ! तुम प्रकाशित रचना साहित्य इतरांना दाखविण्यात तुम्हास खचित आनंद वाटत असण नाही का! आपण श्रींच्या मराठीतून प्रकाशित होणाऱ्या एकमेव मासिकातून लिहितो अभिमानाचा खराखुरा आनंद निर्भेळपणे लुटावयाचा असेल तर तुम्ही या अंकापासून श्रीमहाराजांना सांगा, अगदी निक्षून सांगा की, बाबा मला तुमच तुमच्याच मासिकातून जन्मभर लेखन करायचं आहे. तेव्हा ते चांगले; शुद्ध, स्वच वळणदार आणि थोडक्यात मांडणी करुन लिहिण्याची हातोटी, बुद्धी मला कृपाव होऊन द्या. तुम्ही हे एवढे आवर्जून स्वामीजींच्याकडे म्हटलेत तरी पुरेसे आहे. संपू विश्वास ठेवा, खात्री बाळगा, श्रीसाईनाथ महाराज तुमची ही मनोकामना निश्चित पू करतीलच करतील.

## साई कवितारती

(संपादक श्री. बिपिन चव्हाण, साईनिकेतन, मु. पो. ता. नव. धुळे, वार्षिक वर्गणी ४ रु. किरकोळ अंक ३ रु.)

केवळ साईकवितेलाच वाहिलेले जगातले हे एकमेव मासिक असून धुळ्याचे कवी कार्यकर्ते श्री. रमेश चव्हाण यांचे चिरंजीव व श्री. बिपिन हे मासिकाचे संपादक आहेत या अपूर्व अशा मासिकाचा पहिला अंक साईभक्त परिवार मंडळ, बडोदा येथे भरलेल्य साईसंमेलनात प्रकाशित झाला होता. त्यावेळीच त्याचे स्वागत साईप्रेमींनी कौतुका केले. या मासिकाला कवितांचा भरपूर खुराक मिळेल, यात शंकाच नाही आणि भरपू खुराक मिळालेले मासिक लवकरच चांगले बाळसे धरील, अशी सदिच्छा प्रगट करतो.

— साईनं

# गोदावरी तटाकी – अवतार दिव्य झाला

गोदावरी तटाकी – अवतार दिव्य झाला
तो आदिअंतहीन – साकार देव झाला ।।धृ।।

जो संत सज्जनार्थ – प्रकटे युगायुगात
जो जन्म घे फिरोनी – नवधर्म स्थापनार्थ
ज्या नामरूप नाही – तो नामरुपि धाला ।।१।।

तो धन्य पुण्य भूमी – घडवीत पुण्यकीर्ती
संगोपिली जियेने – ही दीव्य प्रेममूर्ती
हा पुण्यश्लोक देश – भगवत्स्वरूप झाला ।।२।।

गीता नवी कथाया – जडमूढ भारताला
हा शंखचक्रधारी – श्रीवासुदेव आला
याचा नव्या ऋषीनी – जयनाद घोष केला ।।३।।

समभाव प्रेमधर्म – आता जगी फुलेल
कारुण्य आत्मतेज – विश्वात मोहरेल
हा पुण्य देश माझा – आध्यात्म सूर्य झाला ।।४।।

**– चकोर आजगांवकर**
वाय ११/१७०, सरकारी वसाहत,
वांद्र (पूर्व), मुंबई-५१.

# श्री साई अनुसूया तनय

प्रथम नाथ साईनाथ, गिरीधर मुरलीधर कमलावर।।
फिता मुकुट कफनी वसन, करि चिलीम धरि पात्र।।
भजनी रमत दिन रात, सदा करिसी अग्नि होत्र।।
गुरुवारी येती अमित भक्त, प्रेमे करिती पूजा सांग।।
मुखे वदती जयघोष, दुमदुमले शिरडी क्षेत्र।।
अत्रिनंदना त्रिगुणातीता, अनुसूया तनय दत्तनिरंजन।।
ब्रम्हानंदे मज रमवी सदगुरु परमहंस साईनाथ।।

**– सौ. उमाबाई मं. अमलाडी**
११ पूसा रोड,
नवी दिल्ली.

## श्री साईनाथ प्रशस्तिः

श्री साईनाथ गुरवे कृपापूरितचेतसे ॥
नमः श्री दत्तरुपाय भक्तविघ्नौघहारिणे -१-
सा कृपा नैव यावत् स्यात् साईनाथस्य सद्गुरोः ॥
सुखं न लभ्यते तावत् जलनिर्गतमीनवत् -२-
ईशस्तिष्ठति सर्वत्र कथ्यते साधुभिर्जनैः ॥
परं द्रष्टुं तत्स्वरुपं न शक्यं सद्गुरुं विना -३-
नानारुपाणि देवस्य दृश्यन्ते जगतीतले ॥
दर्शय त्वं सत्यरूपं साईनाथ !कृपां कुरु -४-
थकारो S स्ति शरण्यार्थे थकारो मंगलार्थकः ॥
साईनाथः शरण्यो S स्तु दर्शनं चददातु नः -५-

– **श्री. ज. पु. जोशी**
१७६८, गणेशनगर,
जोगळेकर बंगल्याशेजारी,
डॉ. आंबेडकर रस्ता,
सांगली – ४१६४१६.

## जयजय साईनाथ

जयजयकार जयजयकार बाबांचा ।
साईबाबांचा जयजयकार जयजयकार ॥
साई तुमची सुंदर मुर्ति
साई तुमची जगभर कीर्ति
भक्तांना आश्रय बाबांचा । साईबाबांचा
साई तुमची अगाध शक्ति
तेलावाचूनी दिवे जाळिती
पीडितांना प्रसाद उदीचा । साईबाबांचा
व्हावी तुमची कृपादृष्टी
आले भक्त दर्शन भेटी
षोडपचारे करु तुमची पुजाअर्चा । साईबाबांचा

– **सौ. अपर्णा अ. मोहिले**
दि युनिक को-ऑ. हा. सोसायटी,
छोटाणी क्रॉस रोड,
माहिम, मुंबई - ४०००१६.

# राहिला भरुनी सुगंध

का भास सारखा कुणी यती का आले
राहिले निवासा मानुनी घर हे आपुले ॥धृ.॥

पाउले उमटती ठायी ठायी निशाणी
ती पाहात असता पदरव येई कानी
मन शंकित होता पडणे टपकन् फूल
त्या पाठी येणे मंदस्मित मंजूळ! – १.

मी बसता पूजे पदकमले मजपुढती
जणु कुणी पूजिली गंधपरिमळे नुक्ती
टेकता मस्तका, वरी कुणाचा हात
'कल्याण' निनादे शब्द जणू कानात! – २.

मी वाची पोथी, लावी चरणा लय
हुंकार सारखा येई गहिवरमय
नैवेद्य-आरती स्वीकारीही कोणी
जाहली दुधाची भरली वाटी निम्मी! – ३.

मी गाता गाणे, भास मंदसा ताल
थांबुनी ऐकता, सावध झाली टाळ
भोवती कुणी ना, सदनी घन एकांत
मम कानी भरला वेदघोष साक्षात्! – ४.

जपमाळा छाटी भस्म, खडावा चरणी
बैसली येउनी मूर्ती, माझ्या ध्यानी
मी नेत्र उघडिता नसे कुणीही काही
राहिला भरुनी सुगंध साऱ्या गेही! – ५.

**– प्रा. श्री. र. श्री. पुजारी**
रमानिवास, ९९२, सदाशिव पेठ, पुणे-३०.

# साईंचा आधार

'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती'
उभे तैसे साई, ठायी-ठायी ।
सुखाने ना हर्ष, दुःखाने ना आर्त
तुमचे हाती असे, अवघेचि संचित ।
श्रद्धा सबूरीची, दिली तुम्ही संथा
वृथा का वहावी, पामरांनी चिंता ।
हिताहित मज, जरी आकळेना
साईंचा आधार, सदा भावे मना॥

**– सौ. वासंती नांदेडकर,** एम. ए.
महिंद्र ॲन्ड महिन्द्र लि.,
वरळी रोड नं. १३, मुंबई-४०० ०१८.

# श्री साईलीला आम्हा आकळेना

आम्हा बालकांची। अघटित घटना।
श्री साईलीला आम्हा। आकळेना ॥धृ.॥
येता नित्य भेटी। थोर थोर व्यक्ती
तुझे गुण गाता। येई त्या प्रचिती
थोर तुझा महिमा। या बालकांना
श्री साईलीला आम्हा आकळेना ॥१॥
अनन्य भावे शरण। येता तुज साई
त्यांना तू सांभाळी। होऊनिया आई
देशी तुझ्या प्रेमा। या बालकांना
श्री साईलीला आम्हा आकळेना ॥२॥
नित्य तूं जिवंत। आहे हेची सत्य
अनुभवे येई। त्याची प्रचित
तूंच पूर्ण ब्रम्हा। या बालकांना
श्री साईलीला आम्हा आकळेना ॥३॥
म्हणून मंगले तूं। करी आम्हा ज्ञानी
अघटित घटना। घ्यावया जाणोनि
'प्रमोदिनी' म्हणे। साईनामा विना
श्री साईलीला आम्हा आकळेना ॥४॥

**— सौ. प्रमोदिनी पोतनीस**
२६/७ एच. पी., पिंपरी, पुणे - १७.

# स्वानुभवाचे संकीर्ण श्लोक

माझा अनुभव असे आगळा हा।
स्वरुपे भजावा गुरु निर्गुणी हा।
असे अंतरी जो निराकार रुपी।
स्वये देखती जे ते ब्रह्मस्वरुपी॥१॥
नसे काही लागे तपस्या कराया।
नको काही पूजा नको आरत्या या।
बना वितरागी पहा अंतराया।
स्वये दाखवी तो असे साईराया॥२॥
करा ध्यान त्याचे स्मरा नाम त्याचे।
सदा सर्वकाळी दिसो रुप त्याचे।
निदिध्यास त्याचा असो लागो जीवा।
म्हणोनी मनी हो साई आठवावा॥३॥
साईमार्ग दावी सदा सख्य ठेवी।
मनी भासते जे सर्व दूरीच ठेवा।
सदानंदी आत्मी अहो भक्त त्याचे।
धरा अंतरी बोल स्वानुभवाचे॥४॥

**— श्री. पद्माकर महाराज**
**श्री दत्त ज्योतिष कार्यालय,**
**शान्तीनगर, फोंडा-गोवा.**

# शिर्डीची ओढ

प्रिय भक्तांनो आज सांगते
माझ्या गुरुची किमया गाते॥
भाव भक्तीची गंगा वाहे
शिर्डी नगरी जाऊन पाहे॥१॥
पहाटेच्या भूपाळ्यांने
मन हे डोलते आनंदाने
त्या आनंदी वातावरणे
दिवस जातो वाऱ्यासंगे॥२॥
बालक तरुणाहि जमले सारे
आरती म्हणती एक मुखाने
धन्य शिर्डी धन्य बाबा
तेथे नाही भेदभावा॥३॥
अभिषेकाचा आनंद भारी
समाधी चढण्या मन उल्हासे
सुख दुःख सांगते बाबापाशी
समाधान हे वाटे मनाशी॥४॥
निरोप घेता शिर्डीचा तो
मन न परते गावी येण्या
माझे बाबा सांगती तेव्हा
मुली मी आणिन गुरुपौर्णिमेला॥५॥

– सौ. निर्मला चं. मालवणकर
साई-स्मृती, व्हिन्सेट सेन्नर,
दादर.





# ॐ बाबा साई

ॐ बाबा साई ॥धृ.॥
व्याकुळतेने हांक मारी,
बाबा त्यांना ओ देई ॥१॥
भक्तांसाठी धावत येती,
अमुचे बाबा साई ॥२॥
घोर चिंता असता चित्ती,
साई त्यांची करिती मुक्ती। ॥३॥
साईनाम जपता ओठी,
पळून जाई भय दुष्कृती ॥४॥
अन्नाविण जो असे उपाशी,
घास मुखीचा भरवि त्यांसी ॥५॥
दीन-दुबळा येता पायीं,
सामर्थ्याचे दीन घाली ॥६॥
भक्तिरसाची भरुनी सुरई,
साईनाथा अर्पूया करि ॥७॥
भावफुले वाहूनी चरणी,
पुण्याईची भरुया झोळी ॥८॥
कृपाछत्र हे असता डोई,
उणीव कशाची आम्हा जीवनीं ॥९॥
राम-साई, श्याम-साई,
ध्यास अखंड मम मनी ॥१०॥

– सौ. निलिमा ज. नाईक
११ ॐ विवेकानंद,
शिवसृष्टी, कुर्ला (पूर्व),
मुंबई – २४.

# प्रभू साईनाथा

शिरडी आम्हा पवित्र तिर्थक्षेत्र
रंजल्या गांजल्यांना मिळे आपल्या कृपेचा आधार
आपल्या चरणासी लीन माझा माथा
प्रभू साईनाथा, प्रभू साईनाथा !
चमत्कारातून साक्षात्कार सर्व आपल्या हाती
मुखी आपले नाम, घडो अखंड भक्ती
सुख शांती मोक्ष प्राप्तीचे आपणच माता पिता
प्रभू साईनाथा, प्रभू साईनाथा !
'आपण माझे आपणच माझे' म्हणूनी कितीक झगडती रोपे
भगवंता, अनंता, विधाता ही आपलीच नाही का रुपे?
साऱ्या भक्तांचे आपणच एक दाता
प्रभू साईनाथा, प्रभू साईनाथा !

– **श्री अनंत दाभोळकर**, एम.ए.
रामलखन मिश्रा निवास, साईवाडी,
सहार रोड, अंधेरी (पूर्व),
मुंबई-४०० ०६९.

# साई तो एकची देव

साई तो एकची देव, जयाला दु:ख सांगावे ॥धृ.॥
असे हे जग अति स्वार्थी
नसती ही कुणाचे कोणी
तया जाऊन वंदावे, जयाला दु:ख सांगावे ॥१॥
नसेची भेद लव मात्र
तुझ्या त्या दिव्य दरबारी
म्हणोनी साईस मानावे, जयाला दु:ख सांगावे ॥२॥
जगी जे दीन अन् आर्त
जगी जे लीन प्रेमार्त
तयांचा साई हा देव, जयाला दु:ख सांगावे ॥३॥

– **श्री. हसमुख ओंकार पाटील**
गुजरगल्ली,
मु. पो. ता. नवापूर - ४२५४१८, जि. धुळे.

# भेट बारा महिनानी

चंदनना संगे माय
सुवास तो दरवये
शिरडीना वाटे माय -
कोन गुलाल उधये॥
मन्हा आंगे दाटनी
रेशमनी काचोयी
जरीना पदरनी
साडी नेसून नयी
अशी नजर गयी
साईजीना माय पाये॥
करु आते सिन्गार
सवारु रुप सई
वाजतस बिल्लोर
लाज वाटे माले बाई
समजेना ते काई
काय करु गोदामाये॥
दिवायी दसरानी
भेटस ववायनी
शिरडीना राऊये
वाट मन्ही कोन जोये
बारा महिनानी भेट
लीला म्हने साई रे ये॥

टिप:— दरवये- दरवळे, वाटे- वाटेवर, उधये- उधळे, मन्हा- माझ्या, दाटनी- दाटली, रेशमनी- रेशमाची, काचोयी- काचोळी, पदरनी- पदराची, नयी- नवी, गयी- गेली, पाये- पायावर, सवारु- सांवरु, बिल्लोर- बांगड्या, गोदामाये- गोदामाता, दिवायी- दिवाळी, भेटस ववायनी- भेटते ओवाळणी, राऊये- राऊळी, मन्ही- माझी, जोये- पाहे, म्हने- म्हणे.

**— सौ. लीला डी. मराठे**
दत्तात्रेय निवास,
साक्री रोड, धुळे.

# दर्शन देरे, देरे साईनाथा

दर्शन देरे देरे साईनाथा
तुचि सुखकर्ता, तुचि दु:खहर्ता ॥धृ॥
तुझ्या दर्शनाने। दु:खे हरती
तुझे नाम घेता। मिळते शांती
अखंड नामे। संकट टळती
जन्म मरणांचा, चुकविसी फेरा ॥१॥
तुझ्या उदीने। रोग बरे होई
तेलाविणा। पणत्या लावी
बाबांची ही। किमया न्यारी
कलियुगाचा तूं असे विधाता ॥२॥
स्वामी असे तूं। तिन्ही जगाचा
दीन दुबळ्यांचा। रक्षण करता
श्रध्दा सबुरीची। फुले तुज वाहता
पावते समाधी। तुझी साईनाथा ॥३॥

**— सौ. सिंधु सणस**
साईनगर, काटोल,
जि. नागपूर.

## "माझा साई"

ह्या साईचा मला छंद लागला आहे.
त्याच्या नादातच मी धुंद झालो आहे.
पाण्यानं पणत्या पेटवून,
डोळ्यात बिब्बा घालून,
शिर्डीस ज्यांनी खुलवून सोडलं.
धुनीची राख देवून,
हंडीतील अन्न देवून,
कायमचं आम्हाला खिळवून ठेवलं.
असा हा माझा साई ...
फाटकी कफनी अंगी घालून,
भिक्षेसाठी झोळी अडकवून,
ज्यानं शिरडीला पुनीत केलं.
लेंडीबागेत झाडं लावून,
गुरुस्थानी धूप जाळून,
जीवन आम्हचं सुगंधित केलं.
असा हा माझा साई......

**— डॉ. अनिल मोरे**
मु. पो. धनसार अल्याळी, आंबेवाडी.

## दर्शन

दर्शन घ्यावे
माझ्या साईनाथा
गाईली थोरवी
तुमची मी अनंता ॥धृ.॥
गोदाईच्या तिरी
वसवली शिरडी
प्रकट झाले
निंबातळी
माझी या हाकेला
धावूनी यावे ॥१॥
महिमा उदीचा
तुमच्या थोर
संकट मुक्त
करुनी अपार
माझी या हाकेला
धावूनी यावे ॥२॥
तू छत्र पित्याचे
ठेवी भक्तावरी
अनुभव सारीखा
देवूनी त्रिकाली
तुझीया हाकेला
धावूनी यावे ॥३॥

**— प्रा. श्री. प्र. के. धर्माधिकारी**
श्री संपतराव माने महाविद्यालय,
मु. पो. खानापूर, जि. सांगली.

# आशीर्वाद सप्रेमाचा

शिरडीच्या वाटेवरती
भक्त चालती घडी घडी
घेण्या दर्शन निज देवाचे
श्री साईबाबा कृपाकरी ॥१॥
अगणित ठेचा असतिल पाया
लागतील हो हर घडी
श्री साईंची इच्छा म्हणूनी
भक्त चालती शिरडी-पंढरी ॥२॥
देण्या अपुल्या प्रिय भक्तांना
आशीर्वादच सप्रेमाचा
खेचूनी आणती अपुल्या बाळा
कुठेही असतील स्वयं जरी ॥३॥
नको गर्व अन् घमेंडती
श्री साईबाबां पाशी
सर्व संकटे दूर करिती
ठेवा श्रद्धा नमा SS मनी ॥४॥
इप्सित सारे पुरेच करतील
निष्ठा - श्रध्दा सबुरी ठेवा
ज्याचे मनी अधिष्ठीत साई
असाल जेथे तुम्ही ॥५॥

— श्री. राम धनावडे
३५/३९७३, कन्नमवार नगर क्रमांक २,
मु. पो. विक्रोळी (पूर्व), मुंबई-८३.

# आमंत्रण

तुम्ही माझे नगरी या हो।
मी तुमचा तुम्ही माझे व्हा हो।
किती अजूनी रुसाल का हो।
किती आळवू आता या हो।।१।।
कोण कुणाचा जन्मदाता।
तुमची भक्ति माझी माता।।
कोण कुणाचा जगती त्राता।
तुमची सेवा माझी मुक्ता।।२।।
किती जगात भपका-झपका।
तुमचे दर्शन माझी सुटका।।
कधी मनात येता भाव चिटका।
तुमचे गीतच देई चटका।।३।।
किती जगात नाती-गोती।
तुम्ही माझे व्हा सांगाती।।
कधी मनास येता तृप्ती।
तुम्हा कमलांची मी माती।।४।।
किती जगात हेवा-दावा।
तुमचे गायन माझा ठेवा।।
किती विनवू आता देवा।
तुम्ही या हो या घेण्या सेवा।।५।।
तुम्ही माझे नगरी या हो।
मी तुमचा तुम्ही माझे व्हा हो।।

— श्री. अशोककुमार रणदिवे
'श्रमफल',
८-४१/२., गणेशपुरी
दिलसुखनगर,
हैदाबाद - ५००६६०.

# साईचा त्रिवार जयजयकार

त्रिवार जयजयकार साई।
त्रिवार जयजयकार॥
या साईचे नाम चहुकडे।
साई दिसे मज जिकडे तिकडे॥
नित्य स्मरुया, साई नाम हे, होईल साक्षात्कार॥
साई, त्रिवार जयजयकार ॥१॥
कुणा दिसे हा, रघुनंदन राम।
कुणी म्हणे हा, राधेचा शाम॥
विविध रुपे या साईची, हा दत्ताचा अवतार॥
साई त्रिवार जयजयकार ॥२॥
चमत्कार हे साईचे किती।
पदोपदी मज येते प्रचिती॥
ब्रम्हा, विष्णु, शिव, हा साई, मूर्तीमंत ओंकार
साई त्रिवार जयजयकार ॥३॥

**— सौ. शोभा देशपांडे**
२/११ आगरकर नगर,
अलंकार टॉकीजजवळ,
पुणे.

# ॐ श्री साई समर्थ

कडूलिंबाच्या झाडाखाली,
गुरुस्थान दिसे ।
माझे साईबाबा,
विटेवरी उभे ॥१॥
कडूलिंबाखाली,
पणती तेवते ।
माझे साईबाबा,
दिसतात तेथे ॥२॥
कडूलिंबा खाली,
समयांचे वलय,
माझे साईबाबा,
ब्रह्मा, विष्णू, महेश ॥३॥

**— सौ. शशिकला भा. सोनावणे**
१२९/४३०१, नेहरू नगर,
कुर्ला (पूर्व), मुंबई-४०० ०२४.

# धन्य तुझी चतुराई

धन्य तुझी चतुराई, 'साई' ॥धृ.॥
दुर्भाग्याचा प्रखर उन्हाळा।
संकट सविता सांडित ज्वाळा॥
परि तव कृपया, मम जीवनीं या, मोहरली आमराई ॥१॥
शरणागत जे तुझ्या या पदां।
सत्वर त्यांच्या हरसि आपदां॥
काळवेळ ना, विलंब लागे, ना होई कुचराई ॥२॥
तुजहुनि नच कुणी प्रभू महान।
मजहुनि नच कुणी लघु लहान॥
तू भास्कर मी, सान कवडसा, तू हिमनग मी राई ॥३॥
मनोवांच्छित जे जे मागे।
ते ते द्याया उभाच मागे॥
क्षणां क्षणां ये, प्रचिती प्रभू पण, होऊं कसा उतराई ॥४॥
एक तुला मी शरण रिघावे।
सतत तुझे ते चरण बघावे॥
नकोच याविण, मजला त्रिभुवन, ते तर क्षणिक सराई ॥५॥

**— श्री. नागेश मोगलाईकर**
स्वातंत्र्यसैनिक व ऑनररी मॅजिस्ट्रेट
'नागलक्ष्मी', २८२०, ग. नं. ४,
धुळे - ४२४००१.

## गझल (श्लेष अलंकार)

दुःखीतांचे दुःख मी हृदयात माझ्या साठवितो ।
अश्रू त्यांचे झेलूनी मी भार त्यांचा साहतो ॥१॥
भूक आहे पोटी त्यांच्या जठराग्नी पेटलेला ।
झोप त्याची उडाली, नीत जागा राहतो ॥२॥
तिमिर भवती दाटलेला मार्ग कोठे ना दिसे ।
ठेचा लागे चालणाऱ्या रक्तपूरही वाहतो ॥३॥
पुरे झाले टोचणे रे अन्नकुठवर पाहतो ।
न्याय कोठे नाही, अन्याय आम्ही साहतो ॥४॥

**— श्री. हरीभाऊ बोबडे** एम.ए., बी.एड.
ता. तिवसा, जि. अमरावती.

# साई तुमची सदैव मूर्ती हृदयी राहू दे

साई तुमची सदैव मूर्ती
हृदयी राहू दे
भक्ती गीत गाण्यासाठी
सूर लागू दे....
"साई साई" मंत्र जपता
तन्मय होऊ दे
रुप तुमचे पाहण्यासाठी
दृष्टी राहू दे....
सार्वभौमी अखंड किर्ती
नित्य राहू दे
भक्तीची दीप ज्योती
तेवत राहू दे....
"श्रध्दा-सबूरी" मनी ठेवूनी
वचनी राहू दे
नित्य आशीर्वाद तुमचा
पाठीशी राहू दे....
नसे आता आधार कुणाचा
उदी राहू दे
दिव्य साक्षात्कार तुमचा
सर्वांना पाहू दे....

**— श्री. विश्‍वनाथ सदाशिव चव्हाण**
कमल निवास, क्वारी रोड,
भांडूप (पश्चिम), मुंबई-४०० ०७८.

# साई-साई

जेथे जाते तेथे तेथे दिसतो साई
घरी दारी साई वाटेमध्ये साई ॥
गोड गोड रुप आवडते बाई ॥
कृपाहस्त देतो प्रेम दृष्टी पहातो
हासत सांगतो देतो घेई घेई ॥
सबुरी राखावी नका करु घाई
तुझ्यामागे सदा, उभा मीच राही ॥

**— सौ. प्रतिभा दत्तात्रय पाडगावकर**
१७, आराम बिल्डिंग,
नॉर्थ गोखले रोड, दादर,
मुंबई - ४०००२८.

# साईकृपा

(चाल / एक परदेसी...)

चला चला सारे । जावू शिरडीला ।
जावू साईनाथा। भेटीलागी ॥धृ.॥
शिरडीला जावू । साईरुप पाहू ।
श्रद्धा साऊलीचे । दर्शन घेऊ ॥
सद्‌गुरु साईनाथ । पावती भक्ताला ॥१॥ जावू...
दुःख होती दूर । साईभक्ती करितां।
साईनाथ भक्तीचा । महिमा अपार ॥
साईनाथ भेटीचा । लागला ध्यास ॥२॥ जावू...
सद्‌गुरु साईंची । कृपा भक्तावरी ।
बुद्धी श्रद्धा सबुरी । धरा दृढ।
साईनाथ चरणी । देह अर्पियला ॥३॥ जावू...
साईनाथ उदीला । महिमा अपार ।
उदी भक्षणाने । रोग होती दूर ॥
साईनाथ चरणी । जीव विसावतो ॥४॥ जावू...

**– श्री. राजन अनंत शिंदे**
घ. नं. ३१८६,
टिळक आळी, रत्नागिरी.

# साई माऊली

सकल जनांची साई माऊली
कारुण्याची शीत सावली
प्रेमभराने हाक मारीता । क्षणी तारीते सगळ्या भक्ता
संकटसमयी क्षणात धावे । भक्ता लागी सत्वर पावे
प्रातःकाली स्मरा साईना
क्षणभर विसरे साई न कवणा
जे, जे, जगी दीन अनाथ
साईमाऊली करी सनाथ
साई माझी दिव्य माऊली । कारुण्याची धरी सावली

**– कु. सिंधु रंगराव थोरात**
बि. नं. ४८/२३१२, गांधीनगर, गुलमोहर को. ऑ. सोसायटी,
बांद्रा (पूर्व), मुंबई-५१.

# देख भाऊ साईलीला....

### (अहिराणी गीत)

देख भाऊ साईलीला कशी काय रहासना
पानीना दिवा तवय रात रात बयनात ना॥धृ.॥
    त्यासना दिवामा तेलनी वात
    साईना मशिदमा कोरडीच बात
कोरडी बात जरी तरी, नवल कसं घडना ना
पानीना दिवा तवय रात रात बयनात ना॥१॥
    धावनं मंगे पाव्हाले गाव
    वाढनं तवय बाबानं नाव
दिवायीना दिन तठे साजरा व्हयना ना
पानीना दिवा तवय रात रात बयनात ना॥२॥
    लक्ष्मी नावनी लाडकी लेक
    शिरडी गावमा गरीबनी एक
हातमा दिवा लईनाचे कशी आनंदमा
पानीना दिवा तवय रात रात बयनात ना॥३॥

(शब्दार्थः देख - पहा, तवय - तेव्हा, बयनात - जळालेत, पाव्हाले - पहायला,दिवायी - दिवाळी, व्हयना - झाला.)

**—श्री. रमेश डी. चव्हाण**
'साईनिकेतन'
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे - ४२५४१८

# कुंडलिनी ही जागृत होऊनी

कुंडलिनी ही जागृत होऊनी हृदयमधी येई
मुख जसे ते कमलासम बाई फुलूनिया जाई
ज्ञान गंगा ती खळखळ वाजत वाहे
एकला तो गुरु माझा ग ज्ञानेश्वर बाई, माझा साई ग बाई
ज्ञानाची ती पोतडी भरुनी श्रोत्यांना वाटी,
        सखे ग श्रोत्यांना वाटी
ज्ञान गंगा खळखळ वाजत ती वाही
कुंडलिनी ही जागृत होऊनी....

**— श्रीमती अन्नपूर्णा कुळकर्णी.**

## द्वारकामाईचा पाळणा

निज साई रे गाणे गाते माई
करि आता गाई गाई ॥धृ.॥
तुज जन्म दिला जीवा त्यांची स्वारी
विश्‍वाची दीप्ति सारी
बघ गर्दीही स्वजनांची तुज भवती
मायेची जुळती नाती
भव दुःखांचे बंदे सागर मोती
हे तुझेच कुलगण गोती
जीवांच्या तेजोमय ज्योति
नभी नक्षत्रे तारा होती
स्वर्गीचे सुर वर कोटी
त्या कोटी सुरांनी गाते तुज अंगाई
करि आता गाई गाई ॥१॥
नव नवतीची ही दुनियेची वसती
सारखीच असती नसती
तुज ऐसा हा बाळ नऊ नवसाचा
मोक्षाचा खजिना साचा
ऋणानुबंधाच्या असतील जैशा गाठी
जुळतील प्रीतिची नाती
हे देवाघरचे देणे
नशिबाने येणे जाणे
कुणीतरी कुणास्तव श्रमणे
त्या श्रमणाऱ्या श्रमतील आई माई
करि आता गाई गाई ॥२॥

**– श्री. इन्दुकुमार जनार्दन नाईक**
सोनुबाईची चाळ,
न्यू शक्ति मिल समोर,
आंबेडकर रोड, ठाणे - ६०१.

## भैरवी

साई दरबार शिरडीत
निंब वृक्षाच्या छायेत ॥धृ.॥
कली युगी साई संत ।
प्रगटेल शिर्डीत ।
जैसा शोभे अवधूत ।
धरी कटोरा हातात ।
शुभ्र कफनी डोईस
दिव्य कांती झळाळत ॥
भक्त रंगले नामात ।
टाळ मृदुंग गजरात ।
नाचे साई राऊळात ॥
एक वेळ या शिरडीत ।
साई नाथाच्या राज्यात ।
सुखी व्हाल जीवनात ॥

**– सौ. सुमदा विलास करंगुटकर**
जांगळेवाडी शाळा नं. १, खालचा पाट,
मु. ता. गुहागर, जि. रत्नागिरी.

## — भाव —

येई एकवेळा
नको अंतर देऊ
हृदयात साठवुनि
साई तुला घेऊ ॥१॥
किती भक्त येती
त्याला ना गणती
परि तुझ्या दारी
सारे तुझे म्हणसी ॥२॥
कितीहि होऊ दे
पुष्पांचा वर्षाव
फक्त तुला भाव
हवा असे ॥३॥
कशाचा तुला ना
मुळीच हव्यास
सुख तू सर्वांस
समान देशी ॥४॥

**— श्रीमती श्री शहाणे**
लक्ष्मी निवास,
गडकरी पथ, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१.

## मम इच्छा

वाटे मजला व्हावे गुलाब तव हारातील—
परी कसे उमजावे?
वाटे मजला व्हावे मोगरा, तव शिरी वसावे -
परी कसे मुख दिसावे?
वाटे मजला व्हावे तव मंदिराची पायरी—
परी कशी व्हावी सेवा?
वाटे मजला व्हावे तव अंगावरील शाल—
कशी मिळावी प्रेमाची उब?
काय कळेना कसे यावे तव छायेत—
परि बैस तू मम हृदयात

**— डॉ. कु. इंदू नाईक**
लोणावळा

## निर्माल्य

आवडतात गुलाब तुम्हा म्हणूनी
गुलाब मी हो झाले
भाग्य माझे थोर म्हणूनी
चरणी तुमच्या विसावले
विसावया तुमच्या भाळी
हट्ट करुनी गंध मी झाले
उटी मध्ये तुमच्या साठी
चंदन होऊनि मी झिजले
समईमध्ये तुमच्या बाबा
वात होऊनी मी हो जळले
नाही जाहले समाधान म्हणूनी
धुनी मध्ये मी पडले
धुनी मध्ये पडूनी मी
विभूतीत हो विरले
विभूतीत विरुनी माझे
निर्माल्य हो जाहले

**— सौ. सुनिता सुभाष सकपाळ**
नारळवाडी, शितलादेवी मंदिर कंपाऊंड,
खो. नं. ५०४, माझगाव, मुंबई - १०.

# मी आळविते रे तुजला

मी व्याकुळ भोळी आळविते रे तुजला।
भवसिंधुतून तू पार करी रे मजला ॥धृ.॥
भासे जग हे अतीव सुंदर
परंतु येथील सारे नश्वर
या भ्रांतीतून तू जागृत करी रे मजला।
मी व्याकुळ भोळी आळविते रे तुजला ॥१॥
दु:खाचे पडती पाठीवरती फटके
तव श्रध्दावंतहि पडती मग रे लटके
या माया बंधनी सोडव तू रे मजला।
मी व्याकुळ भोळी आळविते रे तुजला ॥२॥
या येथे कोणी कवणाचे रे आहे?
जो तो केवळ स्वार्थदृष्टीने पाहे
पंकातून इथल्या उचल वरी रे मजला।
मी व्याकुळ भोळी आळविते रे तुजला ॥३॥
हे क्षमा देवते, दयाशांतीच्या मूर्ते
नाहीत तुजविंण अन्य मला दैवते
आचरण्याला सबुरी धीर देई रे मजला।
मी व्याकुळ भोळी आळविते रे तुजला ॥४॥
आईचे गेले प्रेम-पांघरुण आता
अंधारुन आले जग सारे हे नाथा
झाकळल्या जीवनी प्रकाश दावी रे मजला।
दीन-दयाळा, साईराया, मी आळविते रे तुजला ॥५॥

**— सौ. नीलम दीपक देशपांडे**
११३९, ई वॉर्ड,
साईक्स एक्सटेन्शन, कोल्हापूर.

# विसावले मन

विसावले मन श्री साई चरणी ॥
दावी रुप तव। चक्रपाणी ॥१॥
तोडी मायपाश। तोडी भवबंध
अंतरी दाटतो । तुझाच सुगंध ॥२॥
येतसे हृदयी । भक्तीचा उमाळा ॥
घे धाव कृपाळा । मेघ:शामा साई ॥३॥
दत्तगुरु साई । सुखाची आवडी ॥
तूच सवंगडी । म्हणे प्रभा ॥४॥

**— श्री. प्रभाकर जी. कुबल**
वरचा वाडा,
मोरजी, गोवा.

# "साईना" वाहिलेली एकवीस मण्यांची माळ

पहिली माझी ओवी। श्री "साई" मंदिर।
दिन रात जयजयकार। रे गोपाळा ॥१॥
दुसरी माझी ओवी। रामाचा अवतार।
करते मी नमस्कार। बा गोपाळा ॥२॥
तिसरी माझी ओवी। साईंचा आधार।
भक्तांचा उध्दार। रे गोपाळा ॥३॥
चवथी माझी ओवी। आमुची माय माऊली।
नित्य असू दे साऊली। बा गोपाळा ॥४॥
पांचवी माझी ओवी। साई "जगद्‌गुरु"।
नाम नित्य स्मरु। रे गोपाळा ॥५॥
सहावी माझी ओवी। नाम घेता ओठी।
पळे पुण्य गाठी। रे गोपाळा ॥६॥
सातवी माझी ओवी। तेलावीण दीप।
लाऊनी सामर्थ्य दावी। बा गोपाळा ॥७॥
आठवी माझी ओवी। ऊदी, घेता मुखी।
जाती सर्व व्याधी। रे गोपाळा ॥८॥
नववी माझी ओवी। महामारी घालविली।
ओढीया कांठी टाकुनी। बा गोपाळा ॥९॥
दहावी माझी ओवी। दीनांचा कैवारी।
शिरडीचा गिरिधारी। रे गोपाळा ॥१०॥
अकरावी माझी ओवी। धरा "श्रध्दा" "सबुरी"।
दिली तुम्हां शिदोरी। रे गोपाळा ॥११॥
बारावी माझी ओवी। साईंची द्वारावती।
समई तेवती। रे गोपाळा ॥१२॥
तेरावी माझी ओवी। भिक्षापात्र जवळी।
भिक्षांदेही वेळी। रे गोपाळा ॥१३॥
चौदावी माझी ओवी। साई "उमा" "महेश्वर"।
भक्तांचा परमेश्वर। रे गोपाळा ॥१४॥
पंधरावी माझी ओवी। अल्ला मालिक म्हणत।
"राम राम" करित। बा गोपाळा ॥१५॥
सोळावी माझी ओवी। पदांतून निघे जळ।
प्राश होते मन निर्मळ। रे गोपाळा ॥१७॥
सतरावी माझी ओवी। माझी माय माऊली।
दूर दुःखाची सावली। बा गोपाळा ॥१७॥

अठरावी माझी ओवी। वचने नित्य पाळा।
षड्‌रिपूना टाळा। रे गोपाळा ॥१८॥
एकोणीसावी माझी ओवी। "कलावती" आई।
दु:ख पळूनी जाई। बा गोपाळा ॥१९॥
विसावी माझी ओवी। जन्मले जगतांसाठी।
सोसले भक्तांसाठी। रे गोपाळा ॥२०॥
एकविसावी माझी ओवी। तुझी मी लेक वेडी।
एक फुलांची परडी। बा गोपाळा ॥२१॥

**— सौ. कुमुदिनी यशवन्त टिळक**
१६ "साईकृपा", विष्णूनगर,
चौधरी हॉस्पिटल,
गुप्ते रोड, डोंबिवली, जि. ठाणे - ४२१२०२.

## श्री साईनाथा (आरती)

जय देव जय देव जय साईनाथा
भक्तीभावे तुज नमितो माथा ॥धृ.॥
शिर्डी गाव ते झाले पावन। मंदिर मजिद मांडले ठाण
वंदिती भावे हिंदु-यवन। भाव भक्तीला येई उधाण ॥१॥
सगुण रुप तुझे सुंदर।अगाध लीलांचा महिमा थोर
भक्तीलागी तुझी धाव सखा। दयाघन तू करुणा सागर ॥२॥
सर्वांचा धनी तू एक साई। शिवराळ वाचा तुझी नवलाई
भक्तांचे संकट तारले जाई। अंतरी प्रेम उध्दरी साई ॥३॥
फकीर बाबा दीन दुबळ्यांचा। उत्सव मोठा रामनवमीचा
सटका देई साई वर प्रेमाचा। अल्ला मल्लिक मंत्र हा साचा ॥४॥
कफनी रुमाल शोभे साईस। चिधी चोपाळी शयनवास
पावन होशी करता नवस। चैतन्य पुतळा वाटे सर्वांस ॥५॥
पालखीचा नित्य सोहळा। लेंडिचा महिमा असे आगळा
मागून दक्षिणा घेई पडताळा। भक्तांना दावी प्रेमाचा लळा ॥६॥
भक्तांची सोय जगी प्रख्यात। पूर्ण अवतार कलियुगात
बाबांची धुनी नित्य घुमत। बाळ म्हणे सर्वा वंदा दैवत ॥७॥

**— श्री. बाळ द. चित्रुक**
**२६६८ डी, जुना बुधवार, कोल्हापूर - २.**

## साई माझा वेगळा

सार्‍या जगात तुझा जय-जयकार
दूर केला तू अज्ञान अंधकार
माझा साई आहे वेगळाची
ओळख पटली मला त्याची ॥१॥
वाचवले सर्पदंशापासून श्यामाला
गर्वापासून दूर केले हांजीला
माझा साई आहे वेगळाची
ओळख पटली मला त्याची ॥२॥
गर्वाने दाटून जो शिरडी आला
दर्शनाने तुझ्या पाणी पाणी झाला
माझा साई आहे वेगळाची
ओळख पटली मला त्याची ॥३॥
पागल मुलीला दगड मारुन
स्वस्थ झाल्याचे दिले दाखवून
माझा साई आहे वेगळाची
ओळख पटली मला त्याची ॥४॥

**— प्रा. श्री. एच. बी. महाले**
शासकीय जुन्नारदेव महाविद्यालय, जुन्नारदेव,
जि. छंदवाडा, म. प्र.

## प्रभू साईबाबा प्रसाद

प्रकाशमान असतो संताचा अवतार
भूलोकात येऊन घेती भक्तांचा भार
साक्षात असतो तो भक्तांच्या पाठीशी
ईतरापरि नाही रुसत असे भक्तांशी
बायांना सुद्धा असते साईबाबांचे ध्यान
बाळांना तर आवडले त्यांचे रुप सान
प्रत्येकाने ठेवावा श्रीसाईवर विश्वास
साध्य होईल मग त्यांचे काम हमखास
दक्षिणा फक्त असते श्रद्धा आणि सबुरी

**श्री. रा. ब. बारअी**
मुख्याध्यापक, ७३/६ देशमुखपुरा, काटोल,
जि. नागपूर-४४१ ३०२.

# अरे साई, येवू मी कशी?

अरे साई येवू मी कशी? येवू मी कशी?
जन हसतील सारे
पडेन मी रे फशी ॥धृ.॥ येवू मी कशी.....
पायी भक्तीचे घुंगरु
संसाराचे नृत्य करु
तोडूनी बंधने ही सारी
जीव तळमळ रातनिशी ॥१॥ येवू मी कशी .....
गाता गाता झाले वेडी
पायी जड जड भव बेडी
रक्ताळलेल्या हातांनी रे
कशी वेचू तव नामाच्या राशी ॥२॥
राया शिरडीत तू दूर दूर
माझ्या जीवाशी हूर हूर
शिणली रे सारी गात्रे
नेत्र लागले तव पायाशी ॥३॥
मन झाले सैरावैरा
देहासी ना कोठे थारा
पदर पसरीते पायी
दे रे शांती या जीवाशी ॥४॥
भूक तुझ्या रे दर्शनाची
आस उरी तुझ्या भेटीची
तुजवीण काही न सुचे
कशी झाले रे वेडीपिशी ॥५॥
जनलाज सारी सुटली
मनाची बंधने तुटली
सोडूनी सारी नातीगोती
मी झाले रे तुझी दासी ॥६॥
धन मान नको रे कांही
तू फक्त जवळी राही
साई साई रंगूनी जाता
पडे कितीही पर्वत राशी ॥७॥

**— सौ. नीता जाधव**
६२९, सरेकर आळी,
महाड (रायगड).

# साईबाबांची आरती

जय देव जय देव जय साईनाथा।
आरती ओवाळू तव दिनानाथा॥
श्रध्दा, सबुरी मंत्र हा दिला
दीनदलितांचा उध्दार केला
समईत पाणी ज्योत लावी त्याला
अहंकार अंधार क्षणी दूर झाला
जय देव जय देव जय साईनाथा
आरती ओवाळू तव दीनानाथा ॥१॥
तुझ्याकृपेचा प्रकाश दिसला
पृथ्वीवरी स्वर्ग शिर्डीत अवतरीला
सदा फळीवरी योग तुझे चाले
संकटी धावशी जय साईबोले
जय देव जय देव जय साईनाथा
आरती ओवाळू तव दीना नाथा ॥२॥

वेडा वदणारे वेडेच ठरले
भवसागर तरण्या पाय तुझे धरले
साईचरणी मनघा झालासे लीन
शिरडीला येऊनी फेडीली रिन
जय देव जय देव जय साईनाथा
आरती ओवाळू तव दीनानाथा ॥३॥

**– श्री. म. न. घाटुर्ले**
आठवडी बाजार, मु. पो. हिंगणघाट,
जि. वर्धा



# मानस पूजा

साई तू माझा विश्राम ॥धृ.॥
हृदयी माझ्या श्रमविश्राम
श्रध्देने मी करते पूजन
लहर लहर ही अंतर्यामी
जपते साईनाम ॥१॥
आकाशीचा पूर्ण चन्द्र तू
देशी भक्ता शीतलता तू
हृदय सागरा येते भरती
दर्शनी साईराम ॥२॥
संसाराचा रहाट फिरतो
तव नामाची सोबत गातो
श्वासोच्छवासा संगे आहे
पवित्र साईनाम ॥३॥
नश्वर आहे मानव जन्म
पाण्यावरच्या तरंगासम
नकोस दवडू वेळ अमोल तू
भज गे साईराम ॥४॥

**– सौ. मधु पां. गायकवाड**
सी- ५-२८/१/३,
सिडको कॉलनी,
नविन पनवेल.

# श्री साई सगुण दर्शन

साई-भक्तीची शुध्द भावना
विविध लीला रुपे नाना,
अनुभूतीतून प्रकट पहा ना
सगुण रुपे श्री साई-दर्शना ॥१॥
निरागस अन् अजाण बालक
बाल लीला करी ते मोहक
सहज कटाक्षे वदना भोवती
जणू श्री साई-प्रभा विलसती ॥२॥
पाकसिध्दी गृहिणी बनविती
क्षुधा-शांतीस्तव स्वये वाढीती
दृश्य रुप हे अन्नपूर्णेचे
मज गमे श्री साई-स्वानंदाचे ॥३॥
परिवारातील छत्र शिरीचे
चरण पूजिता माय-पित्याचे
"सुखीभव" हे शब्द मुखीचे
शब्द-ब्रम्ह जणू श्री साई मनीचे ॥४॥
सिध्द-संतांचे दर्शन घडता
आनंदे मनी तरंग उठता
हृदय-मंदिरी प्रतिध्वनी उमटती
श्री साई-सगुण हे इथे तिष्ठती ॥५॥
जन सेवेचे जे व्रत आचरती
शब्द-कृतीचे मेळ बसविती
त्यागातून जे प्रेम निर्मिती
श्री साईनाथ मज तिथेच दिसती ॥६॥

चरित्र असे श्री साईंचे प्रेमळ
अंतःकरण करील ते निर्मळ
अनुभूतीतून प्रकट पहा ना
सगुण रुपे श्री साई दर्शना ॥७॥

**– श्री. अरविंद रामचंद गोखले**
२६, अवंती को. ऑ. हौ. सो.
ओक बाग, न्यू स्टेशन रोड,
कल्याण - ४२१३०१.

# जलज्योती
(राग-काफी)

अमावस्येच्या दारी पौर्णिमा
झाली दिवे लागणी
हासला चंद्र चांदण्यातूनी ॥धृ.॥
तेल न देई वाणी जेधवा
परतूनी आली हिरमुस बाळा
सांगे साईस देत हुंदका
स्नेह नाकारीले दुकानी ॥१॥ हांसला
आत्मज्ञानी साओ सत्त्वर
जाणून घेती मर्म बरोबर
घेऊन लोटाभर जळ निर्मळ
प्रकाशिल्या जलज्योती झणी ॥२॥ हासला
ब्रम्हा विष्णू पाहती कौतूक
लक्ष्मी अवतरे स्वयें पृथ्वीवर
शिर्डी झाला आनंदोत्सव
बाळा हर्षली मनी ॥३॥ हासला
हासला साईचंद भूवरी

**सौ. शकुंतला शंकर जगतकर**
एम.ए.
१९/१६२ उन्नत्त नगर वि. २,
गोरेगाव (पश्चिम), मुंबई-४०० ०६२.

# चित्त साईध्यानी

दाटता चिंता मन्मनी,
चित्त लागे साईध्यानी,
अन् मार्ग सापडे झणी,
रमवी मन्मन या जीवनी ॥१॥
सदा ही प्रभुकृपा पाहुनी,
आसवे दाटती नयनी,
धन्य मी या साईदर्शनी,
लीन मी सदा साईचरणी ॥२॥
श्रद्धा अन् सबुरी वाचुनी,
मार्ग हो अन्य नसे जीवनी,
स्मरे मी साईवचने मनी,
होई अन् दंग साईभजनी ॥३॥
आठवुनी 'साईलीला' मनी,
सद्भावे कथुनी त्या जनी,
तयांचा 'भाव' हो फुलवुनी
वाटे मज धन्य या जीवनी ॥४॥

**— श्री. मधुसूदन गोपाळ सावंत**
एम.ए., बी.एड.
३/४७, असोसिएटस कॉटेजेस,
सरदार प्रतापसिंग मार्ग,
भांडुप, मुंबई-७८.

## साई पाळणा

१८५८ मध्ये साई जन्मला
साईनामाचा गजर झाला
पुण्य शिरडी क्षेत्र पावन झाले
भक्त गणांना दर्शन दिले
जो बाळा जो रे जो
म्हाळसापतींने नांव ठेविले
आवो साई म्हणून नांव पुकारले
बायजाआईने जेवू घातले
दासगणूने चरित्र लिहिले
जो बाळा जो रे जो
दिव्य औषधी म्हणून उदी
अमोघ शक्ती ही मंत्र धुनीतली
साई महिमा अगाध करी
जो बाळा जो रे जो
दिव्य शिळेवर दिव्य ही ज्योत
साईबाबांची लीला अगाध
साई भक्तांना असे आशीर्वाद
जो बाळा जो रे जो

**– कुमारी रोहिणी शंकर जाधव**
जुना मुंबई रस्ता, मिलका कॉटेज,
समर्थ सोसायटी समोर, ठाणे.

## साई असता धामी

साई असता धामी
तिथे नाही काही कमी
साई असता जवळी
नित्य दसरा दिवाळी
साई असता आसपास
वाहे आनंद उल्हास
साई असता अंतरी
समाधान भरे उरी
साई खेळताच मनी
मन पावते उन्मनी
साई नाम ओठी
साई उभा राही पाठी
साईनाम घेता मुखी
सदा सर्वदा मी सुखी
साई एक ध्यानी मनी
देई दर्शनास स्वप्नी
साई, साई, साई
दुजे काही ठावे नाही

**– सौ. नलिनी सुरेन्द चिटणीस**
२४२/४सी, मु. पो. ओझर टाऊनशीप,
ता.निफाड, जि. नाशिक - ४२२२०७.

## पावनचरण

अजि मी पाहिले हे पावन चरण
मृदूनी कोमल परम पावन
शितलता घेई रवी किरण
अशी याची किर्ती महान ॥१॥
बसुंधरा धरिते पदरी
भक्ती भावे आदरी
वायुराज ढाळीती चवऱ्या
सुखविती ही कोमल काया ॥२॥
गंगा यमुना अपुल्या पवित्र जले
स्पर्शती ही चरण कमले
अशी मी पाहिली चरण कमले
पहाता पहाता देहभान हरपले ॥३॥
सुमनचे मन गहिवरले
सुमंगल चरणावरी नतमस्तक झाले
जन्मोजन्मी मिळोत ही चरण कमले
तयावरी वर्षती ही नयन कमले ॥४॥
प्रेमश्रूनी साईचरण भिजले
हे शीर कमल तयावरी वाहिले
साई नच माझी मी उरले
हृदय मंदिरी राहोत ही चरण कमले ॥५॥
मम जीवनाचे सार्थक झाले
साईकृपे साईचरण पाहिले

**— डॉ. सुमन खानविलकर**
बॉम्बे पूना रोड,
लोणावळा.

## साईच्या भेटी

साईंच्या भेटी
उतावीळ मन
घ्यावया दर्शन
नेत्रातूर.
भजनाच्या रंगी
भक्त गण दंग
मुखात अभंग
भावभोळा.
भक्तीचा, मृदुंग
चिपळ्याची साथ
संसाराची वाट
सोडूनिया.
लाभता दर्शन
जीव धन्य होतो
मने तृप्तवितो
साईनाथ.

**— श्री. शशिकांत लक्ष्मण शिंदे**
द्वारा श्री. ल. भि. शिंदे (गुरुजी),
मु. पो. शिर्डी,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर.

# आराधना

साई मा, या कुडीचे तू किती कवतिक केले
तुझीया रूपा मम डोळी मी मूर्ति केले
वत्सल रहावी दृष्टि अशीच गे मजवरी॥१॥
क्षुद्राचे वरी उदार मने उपकार अनंत केले
दु:खगर्तेत आवर्जून नामस्मरण तव केले
गायनी तुझेच नाम जपता उठती आनंद लहरी ॥२॥
तवकृपेने माझे अस्तित्व असे येथले
जीवापाड प्रेम केले, सांगू कसे, किती केले
परधर्मी म्हणूनि हेटाळणी, जनमन ते मत्सरी ॥३॥
निष्ठेने परि आरंभिली आराधना, वाग्बाण सहन केले
तुझाच आधार जीवन कसोटीत तारील हे उमगले
कवन हे प्रथमावस्थी, बुध्दि असे पामरी ॥४॥

**—श्री. बाबू डिसोजा**
कॅनरा बँक,
लोणावळा - ४१०४०१.

# साई-माउली

साई माझी पूजा । साई माझी भक्ती
साई पायी वाहिले । पंचप्राण
साई माझे मन । साई माझे धन
साई माझा रावा । साई जीवाचा विसावा
निर्मल ठेवा आचरण । निश्चित होईल कल्याण
मनात याची । ठेवा जाण
साई माझे धाम । साई माझे काम
साई माझी माऊली । कृपेची साऊली
साई चरणी लीन । साई विन नाही कोण
माझे अंतिमस्थान ।
साई माझे

**— कु. अलका आत्माराम भुजबळराव**
साईकृपा भवन,
मु. पो. नाणीज,
ता. जि. रत्नागिरी.

# साँई श्री शिर्डीबाबा स्तवम्

(१)

"शिर्डीबाबा"- महात्मानं शिवं "साँई" शिवप्रदम्
अशिव घ्नं शरण्यंच वरेण्यं वरदर्षभम् ॥१॥

(२)

यं भजन्ति परप्रेम्णा हिंदूपार्शीगणादय:
मुस्लीम बान्धवाश्चैव तं नमामि नरोत्तमम् ॥२॥

(३)

"श्रीमद्दासगणु"र्यस्य भक्तश्च विनयान्वित:
चरितं लिखित येन ओवीबध्दं सविस्तरम् ॥३॥

(४)

लोकाश्चानेक देशेभ्यो भावुका दर्शनोत्सुका:
आग च्छन्ति परप्रेम्णा "शिर्डी"- ग्रामे सुपावने ॥४॥

(५)

प्रसन्नं दर्शन यस्य सर्वपापप्रणाशनम्
सुहास्य वदनं शान्तं महोदारं तमाभजे ॥५॥

(६)

मन्यन्ते यं द्विजो वैश्यो शूद्रो वा पूर्णमुस्लिम:
यथामतिर्जना: केचित् परंजानन्ति को ऽ पि न ॥६॥

(७)

उपास्य देवता मन्ये यस्य दाशरथि: प्रभु:
अत: प्रियतमं यस्य रामस्य चरितं सदा ॥७॥

(८)

एवंविधं योगिवर्यं साधुमण्डल मण्डनम्
"शिर्डी"- ग्रामे वसन्तंच "रामो" भजति सद्गुरुम् ॥८॥

**- श्री. रा. ब. खाडीलकर वकील**
पंचवटी, नाशिक - ३

# शिरडीच्या साईनाथा

शिरडीच्या साईनाथा पाव रे
आता तरी माझ्यासाठी धाव रे ॥
भोळा माझा भाव रे
सोडलाय गाव रे
आता नसे ठाव रे
आता तरी माझ्या साठी धाव रे ॥१॥

गावी सारे राव रे
मारेकरी डाव रे
घेती मज चाव रे
आता तरी माझ्या साठी धाव रे ॥२॥
तुझी मज हाव रे
घालू नको घाव रे
तुझाच मी शरण रे
आता तरी माझ्यासाठी धाव रे ॥३॥
मज नसे वाव रे
घेता तुझे नाव रे
रुप तुझे दाव रे
आता तरी माझ्या साठी धाव रे ॥४॥

– **श्री. मोहन सोनवणे**
'उज्ज्वल कुंज', मु. पो. नवागाव, ता. नवापूर, जि. धुळे

# गुरुमंत्र दिव्य साई

साईविना न दूजा-त्राता जगात नाही ॥धृ.॥
आम्हा कुणी न माता
आम्हा न अन्य जनिता
आम्हा न मित्र, भ्राता
साऱ्या अनाथ भक्ता-साईच एक आई ॥१॥
आम्हा न मंत्र शक्ती
ठावी न दास्य-भक्ती
तृष्णाच कष्ट देती
दैवे अम्हास लाभे-साई-सुपाणपोई ॥२॥
आम्ही महान पापी
विषयान्ध, दुष्ट, कोपी
परि ज्ञात युक्ति सोपी
भावे अखंड जपणे-गुरुमंत्र दिव्य'साई'॥३॥

– **डॉ. विनायक गो. दुर्गे**, दुर्गेश
"सौजन्य", चव्हाण फ्लॅटस्,
धर्मपेठ-विस्तार, शिवाजीनगर, नागपूर - १०.

# साई अनुभूती

अति रम्य हे साईध्यान
अवलोकिता मन झाले समाधान ॥धृ.॥
मनी भाव जैसा स्त्रवतो।
विविध रुपे साई दिसतो॥
विसरुनी जातो माझे मी पण
अती रम्य हे साईध्यान ॥१॥
दुःखार्त मी तुज आळवितो।
प्रतिबिंब मुखी पाहतो॥
भूत दया अन् कारुण्याची दिसे साईखाण
अती रम्य हे साईध्यान ॥२॥
नियतीची ही गुंफण सारी।
संभ्रम पडता मज अंतरी॥
मिस्कील हास्य दिसे सूजाण
अती रम्य हे साईध्यान ॥३॥
असंख्य उर्मि आनंदाच्या।
वल्गना करी मोठेपणाच्या॥
धीरगंभीर ती साईमुद्रा करी सावधान।
अती रम्य हे साईध्यान ॥४॥
भाव भक्तीचे करिता समर्पण।
श्रध्दा सबूरीचे बांधूनी कंकण॥
कशाचीही न पडे आम्हां वाण
अती रम्य हे साईध्यान ॥५॥

– **श्री. सुरेश तु. गोसावी** (छायाचित्रकार
७, मुलई चाळ, बांद्रेकर वाडी
डॉ. बकुल डी. रॉय समोर जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०

## श्रीसाईबाबा सहस्त्र नामावली

श्रीसाईनाथ महाराजांचे कल्याणचे एक निष्ठावान भक्त व युनियन बँकेच्या मुख कार्यालयातील टेलेक्स विभागातील यांत्रिक अधिकारी श्री. चंदने यांनी श्री साईबाबांची एक हजार मराठी नावे मोठ्या कष्टाने तयार केली आहेत. आमच्या भक्तांसाठी म्हणून ती पुढील अंकातून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. सर्वच वाचकांना ती उपयुक्त संग्राह्य वाटतील. – का. संपादक.

# श्री साई गुणवर्णन

साईनाथा तुजला नमिते, जोडुनी दोन्हीं करां
माया पाखर सदैव राहो, तुझीच सर्वेश्वरा
तुजविण अन्य न, दैवत मजला जाणिसी तूं ईश्वरा
सतत वाहूं दे, तुझ्या कृपेचा अखंड मजवरि झरा ॥१॥
धन्य नगरी शिर्डी झाली साई अवतरुन
जेथे चाले, भजन, पूजन आणि गुणगान
सदैव जेथे गरिबां मिळ्ते नित्य अन्नदान
अखंड राहो साईकृपा ही, हेच मागणे वरदान ॥२॥
तूं ही ब्रम्हा, तूं ही विष्णू, तूं ही महेश्वर हे साई
दत्तात्रय तूं, रामही तूंची दाविली रुपें सर्वांही
पंचमहाभूते होती, तुझ्याच हाती रे साई
ऐसा शंकर, शक्तिमान तूं, या जगती साई ॥३॥
अतर्क्य तव ही अगाध लीला दाविसी सकलांना
अनुभव येती तऱ्हेतऱ्हेचे, तुझ्याच भक्ताला
साईचा अवतार जाहला, जगध्दोराला
आला कोठुनी, गेला कोठे? न कळे कोणाला ॥४॥
औषधरुपी तुझ्या उदीचा भक्तांना आधार
अनुभव घेऊनी नित्य पहावे, घडतो साक्षात्कार
श्रध्दा सबुरी वचन तुझे हे, भक्तांना आधार
शिर्डी ग्रामी तुझाच होतो, अखंड जय जयकार ॥५॥

**— सौ. सरोजिनी मुळ्ये**
सरस्वती सदन, इंदूर.

# दर्शन

धावते शिरडीस मन
घ्यावया साईंचे दर्शन
साठवूनी रुप लोचनात
साईंना वसवीन अंतरात
पावन शिरडी साईंची
माझ्या माय माऊलीची
धावते मन शिरडीला
बाबांची सेवा करण्याला
साई सदा ध्यानी मनी वसती
साई मज स्वप्नीही दिसती
लागला ध्यास साईचा
कृपाळू माय माऊलीचा
धावते शिरडीसी मन
साई तुम्ही द्या हो मज दर्शन

**— श्री. दादासाहेब आ. कोते**
लिपिक,
लेखाशाखा,
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

# "ओम् साई - साई ओम"

तुझे दर्शन कसे घडेल
कधी घडेल
ह्या जन्मी तरी घडेल का!
हीच रात दिन आस मला
ध्यानी बसता, मी चिंतिता
तुझ्या चरणी टक लावूनी
माझाच मी विसरुनी जातो
तंद्रीमधे गोड स्वप्न पडते
तुझा चेहरा मोह पाडतो
हसरा चेहरा बघत राहतो
वाटू लागते असेच विसावे
चरणी तुझ्या सदा रहावे
ह्या धुंदीत मी तुझ्याकडे
ओढला जातो पण दुसऱ्या क्षणी
सत्यामधे उतरता स्वप्न विरळ होते
मनी वाटू लागते –
स्वप्नात नेहमीच डुंबावे
परि सत्याची कास हवीच

– **डॉ. ग. स. कामत**
११९४/१३ प्रसाद बंगला,
शिवाजी नगर, पुणे-४११ ००५.

# विभूती

तुझी पायरी जो चढला,
रिक्त हस्त नाही गेला।
तुझ्या पावन स्पंदांनी,
क्षणी धूतपाप झाला ॥१॥
अवधूत, साई, स्वामी,
तुम्ही समर्थ सर्वदा।
सार्थ करित या बोलांना
महा निद्रेत जागता ॥२॥
महा निद्रा समाधीत,
अस्थिदेह शांततेत।
परी द्वारकामाईची,
धुनी सदा धुमसत ॥३॥
युगे युगे धुनी येथे,
दीप तसे जेथे तेथे।
गंध प्रकाश देणार,
पाप ताप जाळणार॥
अशी विभूती देणार ॥४॥

– **श्री. द.**
१४३८, हुंडीवाला ले
नाशिक -

## 'महिमा धुनीचा'

काय वर्णावा महिमा धुनीचा
हा प्रसाद खरा चमत्काराचा।
धुनीचा सुगंध पसरे हवेला
जवळ केले साऱ्या जगाला।
मन माझे कसे भ्रमरा सारखे
साईनाम हे नाव नित्य माझ्या मुखे।
जो कोणी नतमस्तक झाला
तो समजावा मोक्षाशी मिळाला।
कुठे गोड सहवास मज मिळे
हे कसे घडे ते ना मज कळे।
काय अनंत महिमेचा सिंधू
नयनी भरल्या असंख्य मोती बिंदू।
दुःख कसे पळाले हे अचानक सारे
आशीर्वादाचे वाहू लागले वारे।
शेवटी विनंती करितो आता
करावे मन पावन माझ्या साईदाता।
द्यावे मज साक्षात् तुमचे दर्शन
होईन मी कायमचा पावन।
काय वर्णावा महिमा धुनीचा
हा प्रसाद खरा चमत्काराचा।

**– श्री. राजेंद पांडुरंग गवळी**
लेखाशाखा विभाग,
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी.

## साईमहिमा

अगाध महिमा साईनामाचा
प्रसन्न वदना साई पाहता।
नयनी येई प्रेमळ सरिता ॥१॥
सर्वस्व वाहिले गुरुरायाला ।
गुरुपाऊले पाहिली शिरडीला ॥२॥
माझ्या मनाने हट्ट धरला ।
साईप्रसाद मला पावला ॥३॥
समाधी मंदिरी सखा भेटला ।
त्याने साईस हार चढविला ॥४॥
साई पूजेने मोह सुटला ।
निर्मोहीने देव पाहिला ॥५॥
दूर झाली प्रपंच व्यथा ।
साईनामे होई एकाग्रता ॥६॥
उध्दारण्या लहानुसुताला ।
अध्यात्माचा मार्ग दाविला ॥७॥
अगाध महिमा साईनामाचा

**– श्री. वि. म. हटवार**
१४९, रेशीमबाग, नागपूर - ९.

# साईंचा हात इथे तिथे ....

प्रत्येक घटने मागें असे साईचाच हात
साई येथे तेथे साई सर्व जगतात ॥धृ.॥
साई वाचून नाही जागा
माझा शब्द नसे वाउगा!
शोधून बघ हृदयात ... असे साईचाच... ॥१॥
साईमय हे जगची झालें
त्याच्यावाचून काही न उरलें!
साई न भावनात ... असे साईचाच ... ॥२॥
खळखळ वाहात्या नदी जलात
झुळझुळ वाहात्या पवनात
दिसतात साईनाथ ... असे साईचाच... ॥३॥
हा माझा तर छंद आगळा
आता पुराच नाद जडला!
वावरतों मी सोडून खंत ... असे साईचाच....॥४॥
त्यांचा मला पुरा विश्वास
प्रथम पासून वाटतसे खास!
नाही जीवनाची उरली भ्रांत ... असे साईचाच ....॥५॥

— **श्री. श्री. तु. नाईक** (एम.ए.)
हेलिमा मंझिल, विष्णुनगर,
डोंबिवली (प.)

# शिर्डीमाहात्म्य

पूर्ण ब्रह्म हे अवतरले ।
शिर्डीचे भाग्य उजळले ॥धृ.॥
शिर्डी ग्राम अति लहान ।
साईवासे झाले महान् ।
महिमा वाढे अति म्हणून ।
धन्य धन्य जाहले ॥१॥
साईरुपे श्री गुरुदत्त ।
वसती या पावन भूमीत ।
पावन खेडे हे विख्यात ।
तीर्थक्षेत्र बनले ॥२॥
साई जरी हा समाधिस्थित
जिवंत भासती मज दिनरात
वसती नित ते मम हृदयात
विश्व वंद्य जाहले ॥३॥
साई नच केवळ शिर्डीत ।
त्रिभुवनी असूनीहि सदा अतीत ।
विश्वव्यापक विश्वातीत ।
वाहले प्रीतीची मी फुले

— **डॉ. कु. सुनंदा कुलकर्णी**
१/वसंत बहार, ठाणे.

# याचि देही, याचि डोळा

।।धन्य जाहले, अजि मी धन्य जाहले।।
याचि देही, याचि डोळा साईरुप पाहीले ।।धृ.।।
साई मूर्ति सगुण साजिरी
प्रेमकृपेने भक्तां तारी
पादस्पर्शे शिर्डी उध्दरी
दर्शनास तव वेडी झाली
धन्य जाहले, आज मी धन्य जाहले
याचि देही, याचि डोळा साईरुप पाहीले ।।१।।
नास्तिक तेहि भाविक झाले
हीच पंढरी म्हणू लागले
विठ्ठलरुपा कल्पू लागले
अंतर माझे भरुनी आले
धन्य जाहले, आज मी धन्य जाहले
याचि देही, याचि डोळां साईरुप पाहीले ।।२।।
साईची ती प्रेम दृष्टी
त्या दृष्टीने वेड लाविले
साई साई मन जपू लागले
वर्णायातुन शब्द न सुचले
साईनाम ओठातून स्फुरले
धन्य जाहले, आज मी धन्य जाहले
याचि देही, याचि डोळां साईरुप पाहीले ।।३।।

**— सौ. निना पराग साळवी**
१/मिस्किटाचाळ, उमेळा फाटकासमोर,
पापडी, वसई - ४०१२०७.

# निर्मोही कोण

जगामाजी निर्मोहि हा कोण आहे
तुझ्या अंतरी तूच शोधूनि पाहे
निगर्वी कुणी लोक असतील जाण
निर्भय जनांची न असेल वाण
निश्चिंत कोणी न मिळेल मात्र
म्हणेल निर्मोहि असा कोण पात्र
मोक्ष प्राप्ति का इच्छितांति ज्ञानी
समजू शकेना साईदास अज्ञानी

**— श्री. गजानन मुर्लिधर कुळकर्णी**
पूजा ३/त/१९,
जवाहरनगर, जयपूर - ३०२००४.

# दर्शन

स्वप्नात माझे मन आनंदित होते
मनातच वाटते की, आज कोण बरे येते
पहाटेवेळी थाप माझ्या दारावर पडते
आनंदी मनाने झटकन मी उठते
वाटते माझी काळजी तरी कोण घेते
लवकरच मला झोपेतून जागे करते
दार उघडताच क्षणी कोणी दिसतच नाही
मन्मनी वाटे मला भास तर होत नाही
माझी काळजी घेणारा दिसत कसा नाही
असे कसे घडते काही कळतच नाही
जन म्हणते साईबाबा दिसतात
मग मी म्हणते माझ्यावरच का रुसतात
मला मात्र कसे नाही दिसत
पण
अचानक कोणी कानात माझ्या कुजबुजते
माझी छबी तुझ्या हृदयीच वसते
वेडे तूच मजवरी का रुसते
मग मी गालातल्या गालात हसते

**– सौ. पुष्पा अशोक बागूल**
देविदास चक्कीमागे, पटेलनगर,
उल्हासनगर - ५, जि. ठाणे.

# अंतरांत असू दे साई

शब्द न उरले मजकडे आता
वर्णाया तुज साई
सारे मनींचे पुरविशी नाथा
नुरे मागणे काही.
आम्ही बोलावे, तूंच घडवावे
योगायोग हा नाही
घासात तू, नी श्वासात तूंची
व्रत हे अमुचे राही.
नको मिळू दे गाडी-घोडा
धनदौलत आणि काही
''श्रध्दा-सबूरी'' सदैव असू दे
अंतरात केवळ 'साई'

**– श्री. विजय द. हजारे** एम.ए.
सी./६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली (पूर्व), मुंबई - ४०००६६.

# साईबाबांची आरती

१ आरती करितो गुरुवर्या।
सच्चिदानंद साई सदया ॥
२ प्रेमे धरिसी दिना हृदया।
सकल मति मला तू नेसी विलया॥
३ काल सम दृष्टा दंडाया।
येशी जगी भक्ता झुगवाया॥
४ अहा तूं ज्ञान मूर्ती ते जा।
दिन मणी उदय पाहु दुजा।
यात्रेचा भार। शोभे महाद्वार।
साईबोध तुझा प्यारा।
तत्पर असती सिध्द ठाया।
घेऊनी वैराग्याची सरशी।
जर जर करि जो षड्रिसी।
अतर्क्यची झाला निगमासी।
हरिहर वंदितो हो ज्यासी।
जळता प्रचंड तृण राशी।
आज्ञा पिले हो इंदनाची।
साई योगी मुगुट मणी
ज्याते सुताधिन रजनी ॥धृ.॥
आरती करितो गुरुवर्या ॥धृ.॥

**–श्री. चिंतामण लक्ष्मण शिंत्रे**
शिंत्रे सदन, "डी" १४,
दहावा रस्ता, चेंबूर, मुंबई - ७१.

# दैवत श्री साईबाबा

**(चालः ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर)**
जगदुध्दारक साईबाबा
भूवरी अवतरले
माझे हे दैवत की बनले ....॥धृ.॥
मानव देही मी ही जन्मलो
सद्भाग्ये मी साई स्मरलो
धन्य जीवन झाले ..... माझे हे ...- १
येती अडचणी संसारी या
साई स्मरणे जाती विलया
पथ दर्शक आले ..... माझे हे.....- २
धकाधकीच्या या जगतात
अस्थिर माझे मन हे होत
साईकृपे स्थिरले ..... माझे हे .... - ३
संभ्रमात मी जेंव्हा पडतो
साई स्मरणे शांत ही होतो
प्रत्ययास आले ...... माझे हे .....- ४
धरिता मनी कांही संकल्प
साई स्मरणे जाती विकल्प
मनोरथ पुरले ..... माझे हे .... -५

**– श्री. गो. द. पाठक**
माधवकृपा, संजय गांधीनगर,
मु. पो. वाडा, ता. वाडा, जि. ठाणे - ४२१३०३.

# तूच असशि अमुचा, साई पांडुरंग

**चाल –** अबीर, गुलाल उधळित रंग,
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग ॥धृ.॥
शिरडीत येती सारे भक्त वृंद,
साईंच्या भजनात सारे झाले दंग ॥धृ.॥
तुझ्या चरणाचे तीर्थ आम्ही घेऊ,
तुझ्याच नामाने पावन होऊ,
तुझीच सेवा करु आम्ही, तुझेच गुण गाऊ,
तूच असशी अमुचा, साई पांडुरंग ॥१॥
दसरा, गुरुपौर्णिमेसी साईभक्त येती,
धर्म, जाति, पंथ येथे काहीच नसती,
नवसाला पावते, समाधी साईंची,
वर्णावा कसा, साई-भक्तीचा आनंद? ॥२॥

**– सौ. संगीता गोडबोले**
(एम. ए., बी. एड्.)
प्लॉट नं. ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, 'परिमल' बंगला,
पुणे - ४११ ०३५.

# दर्शन द्या

दर्शन द्या श्रीसाईनाथ गुरु।
आलो शरण तुम्हां मी आलो शरण ॥धृ॥
ब्रम्हा, विष्णू, आणि महेशा,
करी प्रार्थना तुज जगधिशा ॥१॥
जीवनी असती दु:ख यातना।
तारुनिया न्यावे हे भगवंता ॥२॥
मी तुझा जरी अससी माझा।
तोडुनिया देवा ह्या भवपाशा ॥३॥
दीन दयाळा साई महंता।
कृपा दृष्टी पाहावे सद्‌गुरुनाथा ॥४॥
विनवी बाळ तुझें साईबाबा।
आपुलकित करि मज तव पद कमला ॥५॥

**– श्री. भालचंद वाकनीस**
श्री साईधाम, हुतात्मा कोतवाल नगर,
कर्जत (कुलाबा).

# श्री साई दिपवाली

आनंदाची दिपवाली । श्री संतांच्या दारी
तेवती चोहिकडे । नक्षत्रे भुवरी ॥
झडती चौघडे । वाजतात भेरी
पैठण नेसुनी । उषा सामोरी ॥
उठा साईनाथा । ऐका ललकारी ॥ मुजरा घ्यावा । सेवक हाकारी ॥
उष्णोदके स्नान । सुगंधी उटणी । सुवर्ण सुमने । ताजे आर्पी ॥
फुटती फटाके । बार फार जंगी । प्रकाश सर्वांगी । तेज आगळे ॥
कफनी रेशमी अंगी । शेला जरतारी । भाली विराजे । मुगूट सोनेरी ॥
फुलांचे गुच्छ । तुळशीच्या माळा।सर्वांगासी । थाट बहु केला ॥
दुग्ध केसरी । गोड फळे ताजी
लाडू नि करंजी । फराळासी ॥
पक्वान्नाची लूट । अन्नपूर्णाबाई । वाटे नवलाई । तृप्ती मानसी ॥
काढुनी रांगोळी । वाजते सनई । भगिनी मुक्ताई । औक्षण करिते ॥

**– श्रीमती रुक्मिणी बेंद्रे**
के. सी. चौधरी यांचे घर,
शारदानगर, भुसावळ,
जि. जळगाव.

# साई महान धन्वंतरी

श्री साई महान धन्वंतरी
क्लेश बाधा दूर करी।
साई स्मरता सदा मनीं
भव-भय दुःख दूर होई।
ऐसी दीनांची ही आई
कठीण समयी धाव घेई।
बिब्यासवे डोळे बरे
ऐसा कृपाळू हा साई
दळण दळी जात्यावरी
मरीची साथ दूर करी
काय वर्णू मी श्रीहरि
मी दास लीन तया चरणावरी

**श्री. विनोद दिनकर शिरसाट**
वैश्यवाडा, सावंतवाडी.

# चला सारे भक्तगण, शिरडीसी जाऊ

चला सारे भक्तगण, शिरडीसी जाऊ।
सगुण रुपे साईचे, डोळा भरे पाहू ।।धृ।।
महिमा पुण्य शिरडीचा वर्णिता ना पुरे।
दिव्य ऐसे साईरुप सुंदर गोजिरे।
भक्तासाठी नेत्रातुनी करुणा पाझरे।
दयारुप श्री साईचे, दर्शनासी घेऊ ।।१।।
धर्म, गीता, भागवत, भक्तांना सांगणे।
जाति धर्म वर्ण भेद बंधने तोडणे।
मानवासी बंधुभाव, मंत्र एक देती।
भक्ता कार्य हेच उरे, देहभाव ।।२।।
महासंत शिरडी साई, नाव जती सर्व।
भेट होणे आपणाला, सुयोगाचे पर्व।
घटी ऐसी साईभेटी, लाभणे अपूर्ण।
आज मिळोनिया सारे श्री साईगुण गाऊ ।।३।।

**– श्री. अशोक कुमार सातव**
सेक्टर नं. ५, सडक नं. २७
क्वॉर्टर नं. ५/सी, भिलाई नगर
जिला दुर्ग (म. प्र.) - ४९०००६.

# श्री साईनाथ

करी मी संकटावरी मात, जसा वीर धनुर्धारी
तुच माझा कैवारी, तूच माझा सखा हरी
अ-शोका लागली तुझी आस, नको आता मोक्ष
करावी जीवन मरणाची वारी, परी असावे तुझ्या दारी
साई तुझा हात शिरावरी, झालो धन्य ह्या वारी
मी काळे वेडे कोकरु, साई तुझ्या चरणीचे लेकरु।।

**– श्री. अशोक साप्ते**
साई मशिनरी प्लांट,
प्लास्टीक मशिनरीज,
हायड्रोलीक इक्विपमेंट,
श्री साई निवास १२,
भाईंदर (पूर्व), जिल्हा - ठाणे.

# नाही मी अनाथ

असता पाठीशी, साई माझी आई
फुकाच का म्हणते "मी" तूजसी अन्यायी
संकल्प केला शुन्यातून निर्मिण्याचा
पण समोर होते जंगल स्वार्थांच्या काट्यांचा
पण अपरिचित बनूनी मार्ग दाविला हळुवार गवतांचा
फुकाच का म्हणते मी अनाथ तूज अन्यायी ॥१॥
कितीदा केला विचार आत्मघाताचा
साईचरित उघडता दिला इशारा सद्विचारांचा ॥२॥
माणसाला तू इतके कसे केले स्वार्थी
जगाची काळजी वाहता तू कसा निस्वार्थी
सुईच्या टोकाएवढ्या जागेचा मोह
जगात तुझाच अधिकार तरी इतका कसा निर्मोह ॥३॥
अन्न वस्त्र निवाऱ्याची तूच सोय केलीस
डोंगराएवढी संकटे तूच झगडलीस
माणसांनी दूर सारले मी घाबरले
रडू नको म्हणून तूच जवळी घेतले
फुकाच का म्हणते "मी अनाथ" तुज अन्यायी ॥४॥
उजाड माळरानावरी तूच वेलू चढविला
गगनावरी जाण्यास आधार तूच दिला
भ्रांत होती दोन वेळच्या पोटाची
पण दिलेस एवढे जाणीन भूक भुकेल्यांची ॥५॥
एवढेच नको देवू साई भावना स्वार्थाची
सदैव राहू दे तुझ्या पायाशी हीच मागणी अलकाची ॥६॥

**– सौ. अलका अरुण जवळकर**
माहेश्वरी सोसायटी, प्लॉट नं. ७१,
सहकारनगर २, पुणे - ९.

# जय जय साईनाथा

जय देव जय देव जय साईनाथा
चरणावर अपुल्या हा झुकतो मम माथा ॥धृ.॥
विचार तरंग येता मनी
असहाय्यतेने डोळा येते पाणी

साई, साई बोल पडतात कानी
अहंकाराचे होते पाणी पाणी ॥धृ.॥ जय...
हातामध्ये घेता तव आरती
सुख-दुःखाची भूते दूर जाती
साईभक्त सर्व समरस होती
साईनाथ, साईनाथ मुखाने गाती ॥धृ.॥ जय...
भोजनी, आसनी साईंचाच ध्यास
पूर्वजन्माची जाणीव होते मनास
डोळे तरसतात साई रुपास
ॐ कार ध्वनी ऐकू येती कानास ॥धृ.॥ जय....
मानवी जीवनाचे सार्थक झाले
ओठावर बाबा तुमचे नाव आले
साईरुप पाहण्या लोचन आतुरले
मधूचे जीवन हे साईमय झाले ॥धृ.॥ जय...

**— श्री. मधुकर एम. कोथमिरे**
नवनाथ निवास,
मु. पो. पुसेगाव,
ता. खटाव, जि. सातारा.

## कृपा

बसतो उठतो निजतो फिरतो ही देवाची कृपा-
सगळ्या रुपामधुनि पाहतो केवळ त्या अरुपा-
हात धरुनि तो जिकडे नेईल तिकडे सारी धांव-
तो कर्ता अन् तोच करविता हाच अंतरि भाव-
अवघड असुनि होवुनि जातो मार्ग सकल सोपा -
किती मायावी मोहमयी ही संसाराची नदी -
तरीहि अलगद नेई तारुन ना बुडवी भक्ता मधी
विषयांच्याहि मगर मिठीतून सोडवी ऐसी कृपा -
त्याचे ठायी अर्पिताच ही मन आणिक बुध्दि -
आंतर सौख्याचीच होतसे रेलचेल वृध्दि -
कधी न होई शीण कशाचा कुठेहि देहा जुपा -

**— श्री. दत्तात्रय जयवंत जोशी**
६९५ (ब), नवा, सदाशिव पेठ,
पुणे - ४११०३०.

# उत्तर द्या मजला

नित्य उठावे तुज मी भजावे अैशी तुझी माव
पुशीतो तुज, कां कळला नाही, या मनीचा भाव
अंतर्यामी असता तूं मज अंतरला आहेस?
सांग प्रभो तूं माझ्यावरती खरेच का रुसलास?
आईबाबा रुसले तरीहि, तुम्ही न भरावे रागे
अज्ञानी मी बालक तुमचा हेंच मागणे मागे
विश्वाची तुम्ही चिंता करिता मज वंचीत करिता?
तसें असे तर जगी करंटा कुणी न माझ्या परता
तुम्हा कृपेची सदैव उधळण कराच मजवरती
जादूगिरीहि अशी करा की कर माझे जुळती
जेंथे जेथे जावे तेथे नतमस्तक व्हावे
नेत्र उघडिता प्रथम मला श्रीचरण दाखवावे
तुम्हाकडे मी असले काही मागू नये का नाथा
या प्रश्नाचे उत्तर मजला झडकरी द्या आतां
अशक्य ऐसे तुमच्या पाशी काहीहि नसतां
मौज तुम्हाला कां वाटावी व्यथित मला करिता?

**– श्री. मधु पाटणकर**
३४/९०३, नेहरु नगर,
कुर्ला, मुंबई - २४.

# साई परम दैवत

साई धांव रे धांव रे साईनाथा
संकट काळी तू ही दीनांचे
रक्षण करशी सर्व जनांचे
सर्वस्वी तूहीं माझा साई
धांवूनी येशील कां ॥१॥
जीवन माझे तुला वाहिले
सदैव तुझ्या चरणी नमिले
ईश्वर तूं ही सर्वस्वी माझा
नौका नेशिल कां ॥२॥

हृदयी माझ्या तुझी प्रतिमा
सदैव राहू दे भक्ती भावना
विनंती माझी त्वचरणी रे
भिक्षा देशील कां ॥३॥

**– श्री. अंकुश रामचंद सुर्वे**
२/५, चित्तरंजन नगर,
राजावाडी, घाटकोपर,
मुंबई - ७७.

## दर्शन दी साई माका (कोकणी कविता)

खयं खयं शोधु हावं साई तुका
तुज्या शिवाय माका काई नाका
तुज्या भेटीचो हाये धरलो हेका
आता तरी दर्शन दी तू माका ॥१॥
घरांक शोधू का तुका भायरं शोधू?
देवळांक शोधू का ऱ्हुदयांक शोधू?
कोणाल्यां मनाकं, कोणाल्या गावात्
राबून तू येता आपयताच् धावत् ॥२॥
जो तो उठतां शिर्डीक येता
तुगेल्या भजनातं गुंगून वैता
तुज्यात ही कसली जादू आसा
कलीयुगां तारुक तूच आसा ॥३॥
नाका तुका कोंबो नि बकरो
आणी नाका तुका फसवो नखरो
प्रिय तुका ही भावभक्ती भोळी
अर्पीता राशी तुका सर्वे काळी ॥४॥

— **श्रीमती शशीकला रेवणकर**
कुंटोली, बालाजी मंदिराजवळ,
मु. पो. अंबरनाथ (पश्चिम).

## बाबा बाबा साईबाबा

पद क्र. १
बाबा बाबा साईबाबा। बाबा बाबा साईबाबा॥
तुमच्या नामे फोडीत राहो। इथे असामी बसे पहा हो॥
दर्शन देण्या धावुनि याहो। बाबा बाबा साईबाबा ॥धृ॥
दया सागरा तुम्हीच आई। परी आज कां निष्ठुर होई॥
दीन दयाळा धावुनि याहो। बाबा बाबा साईबाबा ॥धृ॥
तुम्हांसारखा प्रेमळ पिता। मला लाभला साईनाथा॥
भक्ताचे मन तुम्ही जाणता। बाबा बाबा साईबाबा ॥धृ॥
अंतर्यामी तुम्हीच राहता। सर्वांभूति तुम्हीच वसता॥
कर्ता करविता तुम्हीच असता। बाबा बाबा साईबाबा ॥धृ॥
बाबा बाबा साईबाबा। दर्शन देण्या धावुनि याहो ॥धृ॥

पद क्र. २

साई माझा मजपाशी। भरुनी राहिला आकाशी।।
साई माझा घननिळा। आकाशाचा रंग निळा।।
निळ्यानभांतूनी घन बरसे। साईराज हा जगीं विलसे।।
कणांकणांतुनी तोचि वसे। जगतामध्ये भरुनी असे।।
साई ध्यानी मन रमते। सर्व साधना तीच असते।।

**– श्री. म. द. अधिकारी**
५ दत्तप्रसाद,
समीर चंदावरकर मार्ग,
डहाणूकर वाडी,
कांदिवली (पश्चिम),
मुंबई - ४०००६७.

# नमो नमो श्री साईनाथा

नमो नमो श्री साईनाथा, नमस्कार माझा
फकीर असूनी तूंच गमसी मज पृथ्वीचा राजा ।।धृ.।।
उभा निरंतर भक्तांसाठी
शिरडी ग्रामी तूं जगजेठी
काय वर्णू, मी तुझी ही गाथा,
नमो नमो श्री साईनाथा .....।।१।।
हांक मारिते तुज मी जेव्हा
त्वरित पावसी तूंही तेव्हा
सन्मार्गी नित चालवी पांथा,
नमो नमो श्री साईनाथा .....।।२।।
'सबका मालिक एक' तूं वदसी
मज लागि परि तूं मोहविसी
तव चरणांवर नमिते माथा,
नमो नमो श्री साईनाथा .....।।३।।

**– सौ. सरल काबाडी**
३, 'फाल्गुनि',
सरोजिनी पथ,
सांताकूझ (पश्चिम),
मुंबई - ५४.

# तूं सर्वांकरितां साई

कुणी कुणाचा इथें न उरला
जो तो अपुल्या पुरता
तुझ्या मंदिरीं येता कळले
तूं सर्वांचा त्राता
साई - तूं सर्वांचा त्राता ॥धृ.॥
उथळ जाहले जीवन सगळे
खऱ्या सुखाचे मार्ग विसरले
संसारातील चिंता मिरवित
जन्म चालला नुसता – १
कीड लागली इथे नीतिला
बधीरता ये जणूं मतीला
शरीर झिजवी जो तो अपुल्या
केवळ स्वार्थाकरितां – २
किती तुझे उपकार अम्हांवर
दिलीस दृष्टी अम्हांस सुंदर
दिली प्रेरणा दिला अर्थ नवं-
तुझा महिमा गाता – ३

**– श्री. कृ. व्यं. हवालदार**
११८, लक्ष्मी वैभव अपार्टमेंटस्,
लक्ष्मीनगर चौक, बजाजनगर,
नागपूर - ४४००१०.

# दर्शन दे मजला

दर्शन दे मजला साई, दर्शन दे मजला
व्याकुळ झाले तुझ्या दर्शना
तुझी लाडकी लेक कल्पना
दर्शन दे मजला साई, दर्शन दे मजला ॥१॥
तुझ्या दर्शने होईन पवित्र
मिळेल मनशांतीचा मंत्र

जमवून सारे सत्संग होईन त्यातच दंग
दर्शन दे मजला साई, दर्शन दे मजला ॥२॥
धांवती जन शिर्डी मार्गी
तुझ्या दर्शनें आळती
मिळेल त्यांना मन शांतीची वारी
घेऊन जातील श्रध्दा सबुरी
दर्शन दे मजला साई, दर्शन दे मजला ॥३॥
आशीर्वाद देतोस लाख मोलाचा
घेते मी ओटीतच ववसा
जपणूक त्याची करीन ठेव भरंवसा
हाच माझ्या भक्तिचा ठसा
दर्शन दे मजला. साई, दर्शन दे मजला ॥४॥

**— सौ. कल्पना मंगेश कोरडे**
१८ काकडवाडी, ४ था मजला,
आर्य समाज समोर, गिरगाव,
मुंबई - ४.

# अढळ श्रद्धा तुजवरी साई

अंतरीच्या वेदनेला
तूंच साई जाणिशी
दुखावलेल्या या जीवाला
पांघरुण मायेचे देशी.
ज्यास म्हणावी आपुली
'दुनिया' तीच घात करी
सत्यासत्य जाणतोस तू
सत्याचा अन् न्याय करी.
काही लपेना तुजपासूनी
विघ्ने येता तूच तारीशी
मोहभावना दूर सारुनी
अढळ 'श्रद्धा' तुझीच करीशी

**— सौ. शरयू मंत्री**
४/२४ अमर, साईबाबा मंदिरा समोर, साईबाबा नगर,
बोरीवली (पश्चिम), मुंबई-४०० ०६६.

# साई दाता

साईनाथा, साईनाथा, साईनाथा, साईनाथा
धाव रे आता साईनाथा, पाव रे आता साईनाथा
सोडिली आस जीविताची
सोडिली आस प्रपंचाची
तुझ्याविना आम्हा कुणी दाता
कुणी त्राता ॥ साईनाथा ॥१॥
तुझ्याच दर्शने दु:ख हरते
तुझ्याच दर्शने सुख मिळते
तू तर वाली सकलांचा
तू तर स्वामी भक्तांचा
तुझ्याविना आम्हा कुणी दाता
कुणी त्राता ॥ साईनाथा ॥२॥
श्रध्दा सबुरी तुज देता
सर्वस्व ही बाबा तूच देता
तूची नेई सुखधामा
तुझ्याविना आम्हा कुणी दाता
कुणी त्राता ॥ साईनाथा ॥३॥

**— श्री. विजय यशवंत सहामते**
मु. पो. चिंचणी,
तालुका - डहाणू
चिंचणी - ४०१५०३., जि. ठाणे.

# ॥ संतसाई आला माझा ॥

**(चाल : देहाची तिजोरी भक्तिचाच ठेवा.)**
फडके डोईला - जीर्ण वस्त्र ल्याला।
संत साई आला माझा - संत साई आला ॥धृ॥
कुठे जन्म झाला यांचा ठाव ना कुणाला।
विना माता-पिता देह जन्मास आला।
ऋषीकुळ नदीमूळ शोधुया कशाला।
संत साई आला माझा - संत साई आला ॥१॥

बारा वर्षे निंबातळी तप आचरिले।
मौन व्रत केले धारण भक्तांनी पाहीले।
भुयारात जळत्या समया चमत्कार झाला।
संत साई आला माझा - संत साई आला ॥२॥
मशिदीत केली वसती म्हणती द्वारकामाई तिला।
रामकृष्ण विठ्ठल रुपे रंजवी भक्ताला।
निराकार निर्गुण "ब्रम्ह" म्हणती "साई" त्याला
संत साई आला माझा - संत साई आला ॥३॥
॥ॐ श्रीसाईनाथार्पणमस्तु॥

**—श्री. विलास तु. पडवळ**
१७३/४, शिवनेरी,
दादासाहेब फाळके मार्ग,
दादर, मुंबई - ४०००१४.

# साई स्तुती

शिर्डीच्या साईनाथा तुझे किती गुण गाऊ रे
तुझ्यासारखा तूच देवा तुझा पत्ता कुणा न ठाव रे
आले तुझ्या दर्शनाला दे मज दर्शन रे
झाले तुझ्या पायी वेडी नको अंत पाहू रे
नियमाने तुला भजने हाच माझा नेम रे
मिळे मनाला शांती साईनाथा तुझे नाम घेता रे
तूच माझा बंधु सखा सोयरा रे
तुझ्याविना सर्व खोटे देवा जगी या रे
तुझे प्रेम मिळे देवा जगी कमी काय रे
तूच माझा खरा देवा उणे आणि काय रे
देवा साईनाथा ठेव सर्वांवर असेच तुझे प्रेम रे
आणि काही मागणे नसे हीच आस पुरवी रे

**— सौ. वैशाली नन्दकुमार गोरे**
पटेल चाळ,
खोली क्र. ७, सिंधी गेट, मुरबाड रोड,
जि. ठाणे, ता. कल्याण.

# साई माझा सखा नसे मज धोका

साई माझा सखा। नसे मज धोका
साई तुझ्या भेटीचा। मिळेल का मोका
भेटी साठी तुझ्या। व्याकुळला जीव
कधीतरी होईल भेट। तुझ्या चरणी भाव
श्रध्दा तुझ्यावरची। राहो सदा अभंग
सबुरी जीवनीत। घडो साई संग
साई देवा तुझ्याविण। नाही कुणी त्राता
तुझ्याच प्रसादे । झालो मी जाणता
तुझ्या आशीर्वादे । जीवन साफल्य
चरणी मागणे एक। श्रध्देचे हो न निर्माल्य
साई नामस्मरण। पुनीत व्हावी काया
साई उदंड राहो। तुझी गोड माया
साई माझा सखा। नसे मज धोका
साई माझी श्रध्दा। साई जीवन नौका
साई माझा सखा। नसे मज धोका
माता पिता गुरु। आधार सर्व लोका

**— श्री. आनंद गणपत सातार्डेकर**
ड्रायव्हर हिल,
वास्को द गामा (गोवा).

# श्री साईकृपेचा हस्त

तुझ्या कृपेचा हस्त असावा –
साई माथ्यावरी॥
ना भय चिंता या संसारी-
काळ उभा तो जरी॥धृ.॥
साई घ्यावी एकच मजला–
तव भजनाची आस॥
गुणामृताची तुमच्या लागो–
सदैव आगळी प्यास॥
तव चरणाचा सुखद वास हा
घडु दे वरचे वरी ॥१॥

अनंत पापे सदैव घडती–
वाटू दे मज खंत॥
तुझे लेकरु तुझ्या कृपेने–
करुन घे गुणवंत॥
माय माऊली-तुझी साऊली–
लाभो जन्म भरी॥२॥

**– श्री. मधुभाई चेंदवणकर**
शिरोडा-गोवा.

# पोहूया साईच्या सागरी

जिकडे तिकडे पडू लागल्या साईनामाच्या सरी
पोहू या साईच्या सागरी
सौख्याची तर साथ मिळाली
भक्तांची आर्तता पळाली
भक्ता वाट मिळाली खरी
अंतर्यामी महाज्ञानी
व्यथा जनाची होई ध्यानी
साईने भार वाहिला शिरी
विशालतेचा नाही अंत
भक्तांना नच कसली खंत
प्रेम हे दिधले नानापरी
भक्तासाठी खेळ निराळे
तुझेच लाघव जगावेगळे
लीला न दावी वरचेवरी

**— कु. उज्वला बळीराम घावरे**
गुजर लेन,
नवापूर, जि. धुळे.

# महाराष्ट्र दर्शन - दिनदर्शिका - १९८८

अनुरुप प्रकाशनातर्फे यंदा प्रकाशित झालेल्या या दिनदर्शिकेच्या प्रत्येक पानावर मराठी संत श्रेष्ठ प्रकृतींची रंगीत चित्रे देण्यात आलेली आहेत. संत श्री नामदेव, रामदास, तुकाराम एकनाथ, अक्कलकोट स्वामी, ज्ञानेश्वर, श्री साईबाबा इ. संत दिनदर्शिकेने समाविष्ट करुन चित्रांचा एक उत्कृष्ट संग्रह भाविकांच्या घरोघरी पोचविण्याचे कार्य या दिनदर्शिकेद्वारा प्रकाशकांनी केलेले आहे, याबद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद. तारखेचे मराठी आकडे ठसठशीत व मराठी मास तिथी वार दिलेले आहेत शिवाय राष्ट्रीय पुरुषांच्या जयंती व पुण्यतिथीही देण्यात आलेल्या आहेत. किंमत ६ रु.

# माझा साईनाथ

**(चाल - मेरा जुता है जापानी)**

देव नाही दगडात, देव नाही मंदिरात
श्रध्दा सबुरीत वसे, तोचि माझा साईनाथ ।।धृ।।
दाटुनी येई प्रेम अंतरी पाहुनी शिर्डीनगरी
तृप्त होती नेत्र दोन्ही पाहुनी साईमुरारी
मुखी ठेवा साईनाम कृपा करी जीवनात ।।१।।
साईनामाचा महिमा मोठा तरती दुष्ट दुर्जन
संकट समयी हाक मारिता तारी भक्तजन
ऐसा माझा साईनाथ तया माझा दंडवत ।।२।।
क्षणभंगूर हे जीवन अपुलें का घालावे वाया
मानवजन्म आज मिळाला पावन होई काया
ठेवू साई हृदयात होऊ सारे पुण्यवंत ।।३।।

**- श्री. बबन डी. येरम**
१/५, कल्याणजी देवजी चाळ,
चिरानगर, घाटकोपर,
मुंबई - ८६.

# देवाची विनवणी

किती 'विनवणी करु' मी! देवा
वाट! पाहूनी! मी! थकलो देवा।।
येशिल माझ्या तूं स्वप्नी देवा।
येशिल म्हणूनी मी! करितो हेवा।।
येशिल म्हणूनी मी! कौतुक करितो।
येशिल म्हणूनी मी! आनंदाने नाचतो।।
येशिल म्हणूनी मी! चिंतनात् रमतो।।
येशिल म्हणूनी मी! मागणे करितो।।
येशिल म्हणूनी मी! देहभान विसरतो।
येशिल म्हणूनी मी! साईसुख मागतो।।

**- श्री. श्याम दत्ताराम नर्से**
सावन्त निवास,
पांचपाखडी, किसन नगर नं. ३,
वागळे इस्टेट, रोड नं. २२, ठाणे - ४.

# माझी साई माऊली

साईबाबा, साईबाबा हो।
कधी येणार माझ्या घराला ॥१॥
तुमचा असे मला सहारा।
तुमच्या विना नसे मला थारा ॥२॥
तुमची आहे दयेची मूर्ती ।
तुमच्यामुळे मिळे मला शांती ॥३॥
तुमच्यावरी असे माझी भक्ती ।
तुम्ही देतां मला प्रचिती ॥४॥
माझ्या मनींचा करा विचार ।
तुम्ही द्यावा मला साक्षात्कार ॥५॥
तुमच्या पदी मी ठेविते माथा ।
तुम्ही आहांत साई समर्था ॥६॥

**— सौ. नलीनीवसंत देशपांडे**
भूषण कृपा को. ऑ. हा. सोसायटी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३.

# श्री साईसमाधीवरील पाकळ्या

प्रकाशक — श्री. डी. बी. पोतनीस, २६/७ एच. बी. पिंपरी, पुणे १७.
(पृष्ठे २५, मूल्य — स्वेच्छा दक्षिणा)

श्री साईलीलामधून गेली २० वर्षे सातत्याने काव्यलेखन करणारे पिंपरीचे पोतनीस दांपत्य मोठे हौशी व उत्साही आहे. दोघंही कविता करतात व दोघंही साईभक्त आहेत. वरील काव्यसंग्रहात त्यांनी साईनाथांच्या वरील कविता समाविष्ट केलेल्या आहेत. श्री. पोतनीस यांनी आपल्या स्वतःच्या १९, पत्नी सौ. प्रमोदिनी यांच्या ४, स्नेही श्री. गाडकरींच्या ५, श्री. दत्तात्रय मोरेंच्या ४, डॉ. सौ. खानविलकरांच्या २ व डॉ. इंदूताई नाईक यांच्या २ अशा ३६ पाकळ्या संग्रहात आहेत व त्या सर्वच गेय व सुमधूर आहेत, हे विशेष होय. साईभक्तीरसाने ओथंबलेल्या कवितांचा हा संग्रह त्यांनी समारंभाने प्रकाशित करुन साईभक्तीप्रधान पर काव्य करणाऱ्या कवी बंधूंच्या समोर एक चांगला आदर्श ठेवला आहे. श्री. पोतनीसांच्या या काव्यसंग्रहाचे आम्ही मनापासून कौतुक करुन त्यांच्या उपक्रमाचे हार्दिक स्वागत करतो.

**— साईनंद.**



# शिरडीचा ध्यास (फुगडीगीत)

साई बाबाचे नांव घेता, शिरडीचा ध्यास लागला
शिरडीचा ध्यास लागला ॥१॥
सगळे जाऊया शिरडीला, आम्ही साईच्या दर्शनाला
बाई, साईच्या दर्शनाला ॥२॥
साई आमुचा रक्षणकर्ता, साईबाबा प्राणदाता
साईबाबा प्राणदाता ॥३॥
साईला जो शरण जाई, साई त्याचे कल्याण करी
साई त्याचे कल्याण करी ॥४॥
चला जाऊ शिरडीला, साई देवाच्या दर्शनाला
साई देवाच्या दर्शनाला ॥५॥
दोन अक्षरी मंत्र साई, देई मजला शक्ति बाई
देई मजला शक्ति बाई ॥६॥
सगळे धर्म साईमध्ये, एकत्र झाले शिरडीला
बाई, एकत्र झाले शिरडीला ॥७॥
धर्म भेद नको आता, मानवता एकची धर्म
मानवता एकची धर्म ॥८॥
"श्रद्धा" "सबुरी"ने जगुया, साईचे ध्यान करूया
साईचे ध्यान करूया ॥९॥
साई बाबाच्या भक्ति लागुया, देश आमचा एक राखुया
देश आमचा एक राखुया ॥१०॥
साईबाबाचे नाँव घेता, शिरडीचा ध्यास लागला
शिरडीचा ध्यास लागला ॥११॥
चला जाऊया शिरडीला, साईबाबाच्या दर्शनाला
साईबाबाच्या दर्शनाला ॥१२॥

— **श्री. गणेश बा. नाईक**
पोष्ट बॉक्स नं. २५८,
पणजी—४०३ ००१,
गोवा.

## साई

साई-साई नाम हे जपले,
जेव्हा जेव्हा मन हे खचलें।
शरीराचेही दुखणे सारे,
मनाचेही खचणे सारे
जपता साई साई-आई,
पळाले सारे लवलाही ॥१॥
मागे, पुढे, खाली, वर,
पहाता दिसते साई कर
क्षणांत माता, क्षणांत पिता,
क्षणात बंधू, क्षणात सखा ॥२॥
नसे मनाचे असे गुंतणे,
नसे ते त्या असे सांगणे
साई माऊली असता जवळी,
कशाचीही न उणीव भासली ॥३॥
वर त्या वंदन करण्या तव कर,
जर का असतील नम्र तर।

**— सौ. रंजना कृष्णराव पवार**
अ४/१२ मानव कल्याण,
बांगूर-नगर, गोरेगांव (पश्चिम),
मुंबई-४०० ०९०.

## वाट चालू शिरडीची

भक्ती करण्या साईची
वाट चालू शिरडीची ॥धृ॥
घरदार सोडून शिरडीला जातो
साईनाथाचे दर्शन घेतो
झालीय हवस मनाची
वाट चालू....॥१॥
मंदिरात - आहे मी उभा
जाऊन समाधीचे दर्शन घेता
भेट होईल नाथाची
वाट चालू .....॥२॥
ज्ञानसूत आता सांगे सर्व लोका
आता तरी तुम्ही मानवधर्म ओळखा
भक्ती करुया नाथाची
वाट चालू ....॥३॥

**- श्री. डी. डी. चव्हाण** ए.एम., सी.पी.एड.
माने पाटील विद्यामंदिर, विसापूर,
ता. तासगांव, जि. सांगली.

## ॐ श्री साई

"साईच एक आधार
साईच एक परमेश्वर
साईच अवघे विश्व
पिंडी ब्रम्हांडी
  अणुरेणीं
साईच आत्मा
साईच परमात्मा
तूंच तूंच साई अत्रतत्र सर्वत्र
म्हणती अज्ञजन अन्न परब्रह्म
ज्ञानचि जाणती परि साईच एक ब्रह्म
कोणी म्हणती जलास जीवन
जाणती योगी महर्षी साधूसंत
नोहें जीवन एक साई वाचुनीं
जगज्जीवन जड-चैतन्य विश्वाचें
कोणी म्हणती पृथ्वीस भूमाता
साक्षात्कारी जाणती परि
साईच एक माता
असे साईच माता-पिता
आधार त्रैलोक्याचौ
अनंतकोटी ब्रह्मांडनायक
असे एकच एक ॐ श्री साई।"

**– डॉ. वि. ने. शिराढोणकर**
नळेगांव,
ता. अहमदपूर, जि. लातूर.

## अर्पण

जैसा मनी भाव
  तैसा पावे देव
काही न अभाव
  साई कृपे ॥१॥
जैसे माझे मन
  तैसी देई खूण
साई जाणे मन
  अंतर्यामी ॥२॥
जया साईकृपा
  असे निरंतर
गुरुशिष्य अंतर
  संपतसे ॥३॥
ऐसा माझा गुरु
  राव रंक तारु
तो माझा आसरु
  रात्रंदिनी ॥४॥
माझे मनी पाप
  मार्ग दावी बाप
साईपद धरु
  मुक्तीसाठी ॥५॥

**डॉ. सौ. मालती राहाटे**
डागा स्मृती रुग्णालय,
नागपूर.

# पतित पावन साईनाम

**र**हम नजर करो ओ साई, साथ नहि अब मेरे कोई।
मैं **घु**मघुम कर ढूंढू तुझे, दर्शन अब तो दे दे मुझे।
दर **प**र तेरे पडा रहूँ मैं, ना जाऊंगा बिना दर्शन मैं।
रघुप**ती** राम तु ही है मेरा, दर्शन चाहू ओ साई तेरा।
चलकर **रा**स्ते ये काटे भरे, अब मैं आया हूं द्वार तेरे।
अब है मेरा **घ**र बस शिर्डी, दर्शन की तेरे प्यास बड़ी
मन हुआ निर**व** अब मेरा, चाहिये सहारा साई तेरा।
आया है ये दुःखिआ**रा** ओ साई, संसार में नहीं मेरा कोई।
दर्शन बिना मैं नहीं **जा**ऊंगा, द्वार तेरे मैं पड़ा रहूंगा।
ध्यान तेरा करूं मैं दिन **रा**त, जीवन बिताऊँ तेरे साथ।
साई ही है राम, साई ही शा**म,** दिल में तो है उसी का नाम।
अब तो साथ नहीं मेरे कोई, **प**ल भर तो देखो ओ साई।
जाते है दुःख तो साई ध्यान से, हो**ति** है खुशी साई नाम से।
दुःखिओं का तो तुम ही सहारा, परि**त** पावन नाम तेरा।
कर लो तो साई नाम की भक्ती दर्शन **पा**कर होगी मुक्ती।
भक्ती से भरो मन और काया, हर पल **व**हाँ साई छाया।
आधार भक्तों के साई हमारे, साई तो जीव**न** प्राण मेरे।
साई बीन अब मैं हूं अनाथ, तुम ही मालीक **सा**ई नाथ।
शिर्डी ही में है अब काशी काबा, सब कूछ तो है सा**ई** बाबा।
शिर्डी ही अब तो भक्तों का धाम, सब के दिल में साई **ना**म।
साई की महिमा तो है महान, साई को कोटी कोटी प्रणा**म**।

**— श्री. एम. एन. खटावकर**
१६९, १ली गल्ली,
गांधानगर,
बेळगाव.



# शिरडी वृत्त
# ऑगस्ट ८७

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली. ती खालीलप्रमाणे...

**किर्तनः—** १) श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.

२) ह. भ. प. श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी.

३) ह. भ. प. श्री. काशिनाथ महाराज भालेराव, त्र्यंबकेश्वर.

**प्रवचन :—** ह. भ. प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी, शिर्डी.

**भजन, गायन, वादन इ. :—** १) श्री. स्वरसुगंध मंडळ, बुरशे बंधु, नाशिक २) बहुरुपी यल्लप्पा, नान्यापुरा, कर्नाटक ३) श्री. के. मुंज्यनाथ ४) श्री. शिवाजी बलवंत शिंदोडकर, पुणे ५) व्ही. मारुती ६) श्री. आबासाहेब पंढरीनाथ ७) श्री. अश्विनीकुमार पंड्या, पुणे ८) श्री. बी. जे. कामत ९) श्री. सुरेश सुखीजा, फरीदाबाद, १०) श्री. श्रीधर बाळकृष्ण राणे, अंधेरी ११) पी. बाळकृष्णमूर्ती १२) विजयालक्ष्मी, चिलवरु १३) श्री नानासाहेब शिंदे, ग्वाल्हेर १४) नुतन नित्यानंद सतसंग मंडळ, वसई १५) श्रीमती वेदावती चैतन्यपुरी, हैद्राबाद १६) श्री. ईश्वरदास, सिकंदराबाद १७)श्री. प्रल्हाद शिंदे व मंडळी, सोलापूर १८)श्री. आनंद शिंदे १९) श्री. ज्ञानेश्वर दिलपाव २०) श्री.श्रीकांत उपाटे २१) श्री. रमन कुमार २२) श्री. सुदंरदास हनुमंत पाटील, सोनगांव, बारामती २३) शिवशाहीर गहीणीनाथ पांडुरंग जाधव देशमुख, पंढरपूर २४) श्री. किशोर तुकाराम बोडे २५) गीतादेवी किशोर बोडे २६) शोभा जगन्नाथ घुंगे २७) श्री रामदास नामदेव रणदिवे, फलटण २८) शाहीर राजेंद्र आनंदा चौगुले, सांगली २९) श्री.दशरथ गजेंद्र सूर्यवंशी ३०) श्री. दगडू लक्ष्मण गोळे ३१) श्रीमती छोटू ताई ३२) श्री. प्रभाकर त्र्यंबक डोंगरे.....

**— : स्वराज्य प्राप्तीदिन :—**

शनिवार दि. १५ ऑगस्ट १९८७ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त श्री साईबाबा संस्थान शिर्डी तर्फे मा. कार्यकारी अधिकारी श्री. रा. द. बन्ने साहेब यांचे शुभहस्ते प्रतिवर्षा प्रमाणे ध्वजवंदन कार्यक्रम झाला. कार्यक्रमास संस्थान कर्मचारी, श्री साईनाथ हायस्कूल बँड पथक, शिक्षक-विद्यार्थी — विद्यार्थिनी, होमगार्ड पोलिस, प्रतिष्ठीत ग्रामस्थ मंडळी, साईभक्त पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांना चहापान देण्यात आले व मुलांना खाऊ वाटण्यात आला. रात्रौ समाधी मंदिर व श्रींचे कळसावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

**हवापाणी :—** शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पाऊस समाधानकारक पडला.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
# श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | —,,— | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | —,,— | हिंदी | — | — |
| ४. | —,,— | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | —,,— | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | —,,— | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | —,,— | तामीळ | — | — |
| ८. | —,,— | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —,,— | हिंदी | — | — |
| १२. | —,,— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | — | — |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —,,— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —,,— | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —,,— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —,,— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —,,— | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | —,,— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | — | — |
| २५. | —,,— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —,,— | हिंदी | — | — |
| २७. | —,,— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —,,— | तेलगु | — | — |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | — | — |
| ३१. | —,,— | इंग्रजी | — | — |
| ३२. | —,,— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |